cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१३६ | गुरुवार दि.०६ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### मुख्यमंत्र्यांनी उदघाटन केलेला पूल गेला वाहून

गडचिरोली ;कोठी-कोरणार पुलाचा काही भाग वाहून गेल्याने येथील वाहतूक बंद पडली आहे, या प्रकारामुळे गडचिरोली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारलेला पूल इतक्या कमी कालावधीत निकामी झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. १५ ऑगस्ट २०२३ रोजी त्यावेळचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि त्यावेळचेच अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या उपस्थितीत या पुलाचे उद्घाटन झाले होते. क्रांतिवीर बाबुराव शेडमाके असे या पुलाला नाव देण्यात आले होते. मात्र, तीन वर्षांतच पूल खचल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण, तांत्रिक देखरेख आणि कंत्राटी व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### मोदींबद्दल आक्षेपार्ह भाषा; अल्पवयीन मुलीला दिलासा

नवी दिल्ली: दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरणाऱ्या अल्पवयीन मुलीला मोठा दिलासा मिळाला आहे. मोदींबद्दल बोलताना पातळी सोडणाऱ्या मुलीच्या विरोधात स्मृती सिंह यांनी पोलिसात तक्रार दाखल केली होती. सिंह यांनी ही तक्रार मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान मोदींनी मुलांना माफ करण्याची भूमिका घेतलेली आहे. त्या अल्पवयीन मुलीनंही मोदींची जाहीर माफी मागितलेली आहे. त्यामुळे तिच्या विरोधात दाखल केलेली तक्रार मागे घेत असल्याचं स्मृती सिंह यांनी सांगितलं.जंतरमंतरवर गेल्याच महिन्यात विद्यार्थ्यांचं आंदोलन झालं. त्यावेळी तिथे जमलेल्या आंदोलकांनी नीट पेपर फुटीवरुन सरकारवर टीका केली. यावेळी एका अल्पवयीन तरुणीनं पंतप्रधान मोदी यांच्याबद्दल बोलताना आक्षेपार्ह शब्दांचा वापर केला.

### सावजी वादावर तुकाराम मुंढे यांनी मौन सोडलं

मुंबई : अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजीच्या वादावर अखेर मौन सोडलं आहे. तुकाराम मुंढे यांनी गेल्या आठवड्यात अमरावती येथील एका कार्यक्रमात सावजीबाबत वक्तव्य केलं होतं. ''सावजी माझ्यासारख्या माणासाने खाल्लं तर एक महिना तरी हॉस्पिटलमध्ये जाईल. ते आपण खातो. म्हणजे काय? ऑयली, फॅटी, सॉल्टी, शुगरी. तुम्हाला हार्ट अटॅक येणार नाही तर काय तुमचं दुसरं हार्ट तयार येईल?'', असं वक्तव्य तुकाराम मुंढे यांनी केलं होतं.तुकाराम मुंढे यांच्या याच वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला होता. तुकाराम मुंढे यांच्या विरोधात हलबा समाजाने आंदोलन केलं. याबाबत तुकाराम मुंढे यांना आज पत्रकार परिषदेत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भूमिका मांडली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०५ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३१.०० क्विंटल | २,५८० | २,७८५ | २,६७२ |
| ज्वारी/हायब्रिड :८१.०० क्विंटल | १,७६० | ४,२५२ | २,९०३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | २,१८० | २,१८० | २,१८० |
| तूर : १.०० क्विंटल | ३,८६० | ४,००० | ३,९३० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:९४.०० क्विंटल | २,३०० | २,८३८ | २,६३४ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: ६.०० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,५०१ | ५,५०१ | ५,५०१ |

# 'एल निनो'चा शेतीला फटका; ग्रामीण मागणीवरही संकटाची शक्यता

**कमी व असमान पावसामुळे खरीप पिकांवर परिणाम होण्याची भीती; तेलबिया व कडधान्य उत्पादन घटण्याची शक्यता**

मुंबई । प्रतिनिधी

**'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदाच्या मॉन्सूनमध्ये कमी आणि असमान पावसाची शक्यता असल्याने देशातील शेती क्षेत्र आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे राहू शकते, असा इशारा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने दिला आहे. या परिस्थितीमुळे ग्रामीण मागणीवर परिणाम होण्याबरोबरच देशाच्या आर्थिक वाढीच्या दृष्टिकोनावरही अनिश्चिततेचे सावट निर्माण होऊ शकते, असे आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले.**



पतधोरण जाहीर करताना मल्होत्रा म्हणाले की, 'एल निनो'मुळे सरासरीपेक्षा कमी आणि असमान पाऊस झाल्यास शेती उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील उत्पन्न आणि मागणीवर दबाव येऊ शकतो. मात्र, जलसंधारण, कमी कालावधीत येणाऱ्या पिकांचा प्रसार आणि हवामान बदल सहन करणाऱ्या वाणांचा वापर अशा केंद्र व राज्य सरकारच्या उपाययोजनांमुळे या संकटाची तीव्रता काही प्रमाणात कमी होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. दुसरीकडे, सेवा क्षेत्रातील सातत्यपूर्ण वाढ, जीएसटी व्यवस्थेतील सुधारणा आणि रोजगाराची तुलनेने स्थिर स्थिती यामुळे शहरी मागणीला आधार मिळत राहील, असा विश्वास आरबीआयने व्यक्त केला आहे. आरबीआयच्या मते, 'एल निनो'चा सर्वाधिक परिणाम ◀◀ पान २ वर

**मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टीत आरोग्यसेवेचा महायज्ञ**

# आमच्याकडे शासकीय मेडिकल कॉलेज द्या मिसेस सीएम कडे आ.सुरेश धस यांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

सुरेश धस आपले लाडके आमदार आहेत, आष्टीमुळे मी पहिल्यांदा बीड जिल्ह्यात येऊ शकले. धस यांनी आपुलकीने मला इथे बोलावलं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आपण दहा दिवस आपण साजरा केला. या कार्यक्रमामुळे कृतज्ञता आणि आभार असे अमृता फडणवीस यांनी म्हटले. अभिमान वाटतोय, शेतकऱ्यांमुळे आपला देश सशक्त सुदृढ आहे. सर्वांच आरोग्य चांगलं राहण गरजेच आहे, असेही अमृता फडणवीस यांनी म्हटलं. तर आ धस यांनी अमृता फडणवीस याना विनंती करताना साहेबाना सांगा आमच्याकडे



शासकीय मेडिकल कॉलेज द्या अशी मागणी केली.

या वेळी बोलतांना अमृता फडणवीस म्हणाल्या की 'बीड जिल्ह्यातील हा माझा पहिलाच कार्यक्रम आहे. शिबिरातील प्रचंड गर्दी आणि रुग्णांची सेवा करण्यासाठी उभारलेली यंत्रणा पाहून समाधान वाटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून आमदार सुरेश धस यांनी वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श घालून दिला आहे. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी असून समाजासाठी सातत्याने कार्यरत आहेत.'' यावेळी आमदार सुरेश धस म्हणाले की, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्या मतदारसंघाला विकासासाठी भरघोस निधी दिला आहे. विशेषतः कुंटेफळ साठवण तलाव व शिंपोरा पाइपलाइन योजनेसाठी सुमारे ₹२,८०० कोटींचा निधी मंजूर करून मतदारसंघाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या योजनेचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे.'' पुढे बोलताना त्यांनी अमृता फडणवीस यांच्याकडे मतदारसंघात वैद्यकीय ◀◀ पान २ वर

### गृहमंत्री गुन्हेगार, म्हणूनच ते तोंड लपवतात-राहुल गांधी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**राजधानी दिल्लीमध्ये संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असून जंतरमंतरवरील विद्यार्थी आंदोलन, राम मंदिर देणगी चोरीवरून विरोधकांनी सत्ताधा-यांना सळो की पळो करून सोडले आहे. आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेला लाठीचार्ज, अमित शहा यांनी संसदेत यावे आणि यावर चर्चा करावी अशी मागणी विरोधक करत आहेत.गृहमंत्री विद्यार्थ्यांचे गुन्हेगार, म्हणूनच ते तोंड लपवतायत, अशी घणाघाती टीका राहुल गांधी यांनी केली.**



पावसाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यातही विरोधकांनी सत्ताधा-यांना कोंडीत पकडले असून बुधवारी संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केंद्र सरकारविरोधात संसद परिसरामध्ये मोर्चा काढला. संसद परिसरातील प्रेरणा स्थळावरील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापासून मकर दारापर्यंत हा भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते ◀◀ पान २ वर

# खा.सोनवणेंच्या मुलाला अटक करा स्व.घुले कुटुंबीयांचे आमरण उपोषण

बीड । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील विलास घुले खून प्रकरणात खासदार बजरंग सोनवणे यांचा मुलगा सौरव सोनवणे याच्यावर घुले कुटुंबाने गंभीर आरोप केले आहेत. सौरव सोनवणेच्या अटकेच्या मागणीसाठी घुले कुटुंबाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. माझ्या मुलाला न्याय द्या, सौरभ बजरंग सोनवणे याला अटक करा, अन्यथा आम्ही इथंच आत्महत्या करू, असा टोकाचा इशारा मयत विलास घुलेच्या आईसह भावाने दिला आहे. तर घुलेच्या टाकळी गावच्या सरपंचाने देखील आक्रमक पवित्रा घेतला असून जोपर्यंत घुले कुटुंबाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही इथून उठणार नाहीत, असा पवित्रा घेतलाय.**




मुख्यमंत्र्यांनी एकाला एक न्याय आणि दुसऱ्या एक न्याय अस करू नये, लहान जात असली म्हणून न्याय मिळणार नाही का ? असा देखील सवाल त्यांनी केला आहे. तर यावेळी मयत विलास घुलेच्या आईने म्हटलंय, ◀◀ पान २ वर

# सुनील तटकरे यांनी धनंजय मुंडेंवर व्यक्त केली नाराजी

मुंबई । प्रतिनिधी

**मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच माझ्या मतदारसंघात पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी मी त्यांच्या बाजूला बसलो होतो, पण मी मध्ये बोललो नाही. धनंजय मुंडे कोणत्या संदर्भाने बोलले, हे मी समजून घेईल. महत्त्वाच्या व्यक्तीच्या पत्रकार परिषदेवेळी बाजूला बसणं हे ठीक आहे, पण बाजूला बसून बोलणं, हे योग्य आहे, असं मला वाटत नाही,'' अशा शब्दांत सुनील तटकरे यांनी धनंजय मुंडेंवर नाराजी व्यक्त केली आहे.**



धनंजय मुंडे यांनी सुनेत्रा पवारांच्या पत्रकार परिषदेत पत्रकाराला प्रश्न विचारण्यापासून रोखण्याबाबत आज सुनील तटकरे यांनी विचारलं असता ते म्हणाले की, ''मी ती पत्रकार परिषद पाहिली नाही. मात्र ज्यावेळी पालकमंत्री जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर पत्रकार परिषद घेतात यावेळी जिल्ह्यातील प्रमुख आमदार पालकमंत्र्यांच्या शेजारी बसतात. हे काय चुकीचं नाही. मात्र ती पत्रकार परिषद त्या महत्त्वाच्या व्यक्तीची असते. महाराष्ट्र काँग्रेसच्या सोशल मीडिया हँडलवरून राष्ट्रवादीच्या अध्यक्षा आणि राज्याच्या ◀◀ पान २ वर

### वृत्तांकनाच्या ऑडिओ-व्हीडीओ क्लिप्सच्या वापरावरच निर्बंध

नवी दिल्ली । वृतसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, न्यायालयीन कामकाजातील ऑडिओ-व्हीडीओ क्लिप्स शेअर करणे किंवा अपलोड करण्यावर घालण्यात आलेल्या अलीकडील अंतरिम निर्बंधांचा अर्थ मान्यताप्राप्त वृत्तसंस्थांना न्यायालयीन सुनावण्यांचे वृत्तांकन करण्यास बंदी असा होत नाही. हे निर्बंध केवळ न्यायालयीन कामकाजाच्या ऑडिओ आणि व्हीडीओ क्लिप्सचा वृत्तांकनात वापर करण्यापुरतेच मर्यादित आहेत असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने न्यायालयीन कामकाजाचे ◀◀ पान २ वर

### राष्ट्रवादीने रुपाली चाकणकरांचा उत्तराधिकारी निवडल

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते आज (बुधवारी) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे यांची, तर युवक प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दोन्ही नवनिर्वाचित पदाधिका-यांना खासदार आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी नियुक्तीचे पत्र देऊन जबाबदारी सोपवली आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाबाबत मात्र अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. दरम्यान, महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे यांची ◀◀ पान २ वर

# आता तर विधिमंडळ पक्ष दुसऱ्याच पक्षात विलीन होत आहेत

नवीदिल्ली । वृतसंस्था

**आपल्या लोकशाहीच्या भविष्याबाबतचा हा मुख्य प्रश्न आहे. लोकशाहीच्या चौकटीत अशा प्रकारची कारवाई अजिबात मान्य आहे की नाही, याचा निर्णय तुम्हाला घ्यावा लागेल. तिथे सर्वकाही आधीच ठरवून झाले होते. कोणताही योग्य निर्णय घेतला गेला नाही. आपल्या देशाच्या राजकीय व्यवस्थेवर याचा प्रचंड मोठा परिणाम होत आहे. आता ही पद्धत सर्वत्र रूढ होत चालली आहे. लोकशाही मूल्यांचे रक्षण कसे करायचे, हे आता तुम्हालाच ठरवावे लागेल, अशा शब्दात ज्येष्ठ विधिज्ज्ञ कपिल सिब्बल यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात ठाकरे गटाची बाजू मांडली.**




यावेळी कपिल सिब्बल देशभरात सुरु असलेल्या फोडाफोडीचा दाखला सुद्धा सर्वोच्च न्यायालयाच्या नजरेस आणून दिला. कपिल सिब्बल म्हणाले, आता तर विधिमंडळ पक्षच थेट दुसऱ्या राजकीय पक्षात विलीन होत आहेत आणि एका चिन्हावर निवडणूक लढवून दुसऱ्याच पक्षाचे तिनिधित्व करत आहेत. या प्रकारचा भोंगळपणा आता एका वेगळ्याच हास्यास्पद स्तरावर पोहोचला आहे. यामुळे निवडणुकीची संपूर्ण प्रक्रियाच एक थट्टा बनून राहिली आहे, कारण अशा प्रकारच्या फेरफार आणि पक्षांतरामुळे जनतेने दिलेला कौल बदलला जाऊ शकतो. त्यामुळे लोकांनी ज्यांना निवडून दिले किंवा ज्यांच्यासाठी मतदान केले, ते सरकार सत्तेत राहतच नाही.कपिल सिब्बल यांनी ◀◀ पान २ वर

### विधिमंडळ पक्ष विरुद्ध राजकीय पक्ष

कपिल सिब्बल म्हणाले की, ''विधिमंडळ पक्ष म्हणजे राजकीय पक्ष नव्हे. हे सर्व मुद्दे आधीच स्पष्ट झाले आहेत. केवळ राजकीय पक्षाचा प्रमुखच कारवाई करू शकतो किंवा बदल करू शकतो. आमदारांच्या एका गटाने बैठकीचे आमंत्रण नाकारले आणि प्रतोदांचा अधिकार नाकारला. पक्षाच्या बैठकीला उपस्थित न राहणे आणि पक्षप्रमुखांचा अधिकार नाकारणे हे स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडल्यासारखेच आहे. सुभाष देसाई प्रकरणात घटनापीठाने स्पष्ट केले होते की, विधिमंडळ पक्षाचा एक गट गटनेता किंवा प्रतोद बदलू शकत नाही. अध्यक्षांनी तो बदल मान्यता देणे बेकायदेशीर ठरवले होते.

cmyk

## अग्रलेख

# ‘आपला–परका’ यादीचा नवा उद्योग सुरू!

कधी काळी सरकार विकासाच्या कामांची यादी तयार करायचं. रस्ते किती झाले, रोजगार किती निर्माण झाला, उद्योग किती आले, शेतकऱ्यांचं उत्पन्न किती वाढलं ही आकडेवारी मांडली जायची. पण आता महाराष्ट्रात वेगळाच उद्योग सुरू झाल्याचा आरोप होत आहे. आता विकासाची यादी नाही, तर ‘‘कोण आपला आणि कोण परका?’’ याची यादी तयार होत आहे, असा गंभीर आरोप विरोधक करत आहेत. प्रश्न असा आहे की सरकार लोकांचा विश्वास जिंकण्यात अपयशी ठरत असेल, तर आता लोकांचीच छाननी करून सत्ता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे का?

४ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन काही कथित कागदपत्रे दाखवली आणि दावा केला की अर्थात च्या नावाखाली गावागावांत नागरिकांची माहिती गोळा केली जात आहे. त्यांच्या आरोपानुसार, केवळ मतदार यादी अद्ययावत होत नाही, तर कोण ‘‘आपला’’ आणि कोण ‘‘परका’’ याची राजकीय नोंदही ठेवली जात आहे. जर हा आरोप खोटा असेल, तर सरकारने एका दिवसात पुराव्यांसह तो खोटा ठरवावा. पण जर उत्तर देण्याऐवजी शांतता असेल, तर प्रश्न तर विचारले जातीलच.

आज महाराष्ट्रातील अधिकारी पाहिले, तर असं वाटतं की राज्यात पाणीटंचाई नाही, बेरोजगारी नाही, शेतकऱ्यांचे प्रश्न नाहीत, रस्त्यांवरील खड्डे नाहीत, स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक अडचण नाही. कारण सगळ्यात मोठं राष्ट्रीय कर्तव्य जणू एकच उरलं आहे! महसूल विभाग, ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन, विविध कार्यालये जिथे पाहावं तिथे एकच धावपळ. इतकी तातडी विकासकामांसाठी कधी दिसली होती का? की मतदारांची यादीच आता सरकारच्या दृष्टीने सर्वात मोठा विकास प्रकल्प ठरली आहे?

लोकशाहीमध्ये प्रशासन हे संविधानाचं असतं, पक्षाचं नसतं. अधिकारी सरकारचे कर्मचारी असतात; पक्षाचे कार्यकर्ते नसतात. पण जर प्रत्येक अधिकाऱ्याला एका राजकीय प्राधान्यक्रमासाठी झोकून दिलं जात असेल, तर प्रश्न निर्माण होणारच. प्रशासन चालतंय की राजकीय व्यवस्थापन?

लोकप्रियता कमी होणं ही लोकशाहीची नैसर्गिक प्रक्रिया आहे. जनता प्रश्न विचारते, नाराजी व्यक्त करते, सरकार बदलते. पण जर उत्तर विकासाऐवजी डेटा संकलन, वर्गीकरण आणि नागरिकांच्या राजकीय ओळखीचा शोध घेणं असेल, तर ती लोकशाहीची ताकद नसून असुरक्षित सत्तेची लक्षणं मानली जातात.

आज प्रश्न फक्त मतदार यादीचा नाही. प्रश्न मानसिकतेचा आहे. सरकारला मतदार हवा आहे की समर्थक? नागरिक हवा आहे की भक्त? संविधानाने प्रत्येक भारतीयाला समान नागरिक मानलं आहे. पण जर राज्ययंत्रणाच नागरिकांना ‘‘आपला’’ आणि ‘‘परका’’ अशा चौकटीत पाहू लागली, तर संविधान पुस्तकात उरेल आणि व्यवहारात राजकीय निष्ठेचं प्रमाणपत्र महत्त्वाचं ठरेल. आज विरोधकांचा आरोप आहे, उद्या कदाचित एखाद्या सामान्य नागरिकाचं नाव यादीतून गायब होईल, एखाद्याला वारंवार कागदपत्रं मागितली जातील, एखाद्यावर संशयाची सावली टाकली जाईल. लोकशाहीचा सर्वात मोठा धोका टँक किंवा बंदूक नसते; नागरिकाच्या मनात निर्माण होणारी भीती असते. सरकारकडे आज संधी आहे. संपूर्ण प्रक्रिया सार्वजनिक करा. अधिकाऱ्यांना काय सूचना दिल्या, कोणती माहिती गोळा होते, तिचा वापर कशासाठी होतो, हे सर्व स्पष्ट करा. कारण पारदर्शकतेला घाबरणारं सरकारच संशयाला जन्म देतं. शेवटी एकच प्रश्नसरकार मतदार शोधत आहे की विरोधक शोधत आहे? कारण निवडणूक जिंकण्यासाठी जनतेचा विश्वास लागतो; नागरिकांची फाईल नाही. लोकशाहीमध्ये मतदारांना क्रमांक दिले जातात, पण शिक्के नाही. ‘‘आपला’’ आणि ‘‘परका’’ ही भाषा संविधानाची नाही; ती सत्तेवर जास्त प्रेम करणाऱ्यांची भाषा असते. आणि ज्या दिवशी सरकारला नागरिकांपेक्षा त्यांच्या राजकीय निष्ठेची जास्त काळजी वाटू लागते, त्या दिवशी लोकशाहीला निवडणुका असतातपण आत्मा उरत नाही.

# निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितर

**गेवराई । प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या लोककल्याणकारी विचारांना अनुसरून तसेच शिवसेना संपर्कप्रमुख मा. मनोजदादा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यात शासनाच्या सर्वसामान्य नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी शिवसेना सातत्याने कार्यरत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आगरनांदूर येथे संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरीचे प्रमाणपत्र शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.**



यावेळी लाभार्थ्यांमध्ये गीता श्रीमंत कोकरे, बबती त्र्यंबक आरेकर, नानीबाई आण्णा आरेकर, अहिल्याबाई कल्याण कोकरे, कांताबाई शिवाजी कोकरे, सविता रंजित कोकरे, छबुबाई सुदाम जाधव, शांताबाई तात्याराव मोटे, सुरेखा चव्हाण (ताकडगाव) आणि शशिकला जयसिंग टकले यांचा समावेश होता. लाभार्थ्यांनी शासनाच्या योजनेचा लाभ मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करत शिवसेनेच्या पाठपुराव्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी संजय गांधी निराधार अनुदान समितीच्या सदस्या सौ. शंकूताई घुंगासे, चंद्रकला मुळे तसेच शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. याप्रसंगी बोलताना शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके म्हणाले, ‘‘मा. उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते आदरणीय एकनाथजी शिंदे साहेब यांनी स्पष्ट आदेश दिले आहेत की, शासनाच्या कोणत्याही लोककल्याणकारी योजनेपासून एकही पात्र नागरिक वंचित राहता कामा नये. संपर्कप्रमुख आदरणीय मनोजदादा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यातील प्रत्येक निराधार, विधवा, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व गरजू नागरिकांना त्यांच्या हक्काचा लाभ मिळवून देण्यासाठी शिवसेना कटिबद्ध आहे. प्रत्येक गावात जाऊन पात्र लाभार्थी शोधणे, त्यांचे प्रस्ताव तयार करणे आणि त्यांना शासनाचा लाभ मिळवून देणे हे आमचे कर्तव्य असून, गेवराई तालुक्यातील एकही पात्र लाभार्थी यापुढे वंचित राहू देणार नाही. शासनाच्या सर्व योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेपर्यंत शिवसेना स्वस्थ बसणार नाही.‘‘ यावेळी उपस्थित महिलांनीही उद्धव बापू मडके यांच्या कार्याबद्दल विश्वास व्यक्त करत, ‘‘गरजू व निराधार कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असून, प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत शासनाचा हक्काचा लाभ पोहोचविण्याचे कार्य ते प्रामाणिकपणे करत आहेत,‘‘ अशा भावना व्यक्त केल्या. या उपक्रमामुळे आगरनांदूर परिसरातील अनेक गरजू महिलांना संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, गेवराई तालुक्यातील कोणताही पात्र लाभार्थी शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून विशेष जनजागृती, मार्गदर्शन व पाठपुरावा अभियान अधिक व्यापकपणे राबविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# बीड एलसीबीची कारवाई; एक गावठी कट्टा व जिवंत काडतूस जप्त



**बीड । प्रतिनिधी**

**स्थानिक गुन्हे शाखा बीडच्या पथकाने धडक कारवाई करत स्वराज्यनगर परिसतातून विनापरवाना गावठी कट्टा बाळगणाऱ्या एकास जेरबंद केले आहे. त्याच्याकडून ४०,००० रुपये किमतीचा एक गावठी कट्टा आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे.**

दिनांक ४ ऑगस्ट २०२६ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष बीडच्या सपोनि श्रीमती जनाबाई सांगळे यांना गुप्त माहिती मिळाली होती की, तुकाराम करांडे हा त्याच्याजवळ गावठी कट्टा घेऊन हॉटेल यशोदा परिसरात फिरत आहे. या माहितीच्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरीत्या सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. पडताळणी दरम्यान संशयित आरोपी तुकाराम गंगाधर करांडे (वय २८ वर्षे, रा. खडक देवळा, ता. वडवणी, जि. बीड) याच्या ताब्यातून पिस्तूल व काडतूस हस्तगत करण्यात आले. त्याला ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची यशस्वी कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम आणि पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या सपोनि श्रीमती जनाबाई सांगळे, पोह/शिंदे, पोह/येवले, मपोह/जाधव, मपोह/चौरे, पोअ/कारले, पोअ/गर्जे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि श्रीराम खतावरकर, पोअ/मनोज परजणे व पोअ/अशफाक सय्यद यांनी पार पाडली आहे.

# पोलीस अधीक्षक यांची कारवाईनंतर जिल्ह्यात पुन्हा गुटखा सुरू ६ लाखाचा गुटखा जप्त

**जालना । प्रतिनिधी**

नवीन पोलीस अधीक्षक रुजू होताच जिल्ह्यामध्ये गुटखा माफ यावर कारवाई करण्यात आली होती परंतु आता जिल्ह्यामध्ये गुटखा सुरू झाल्याचे दिसून येत आहे. जाफ्राबाद शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र शेजारील गाळ्यात अवैध विक्री करण्यासाठी साठवून ठेवलेल्या ६ लाख ४१ हजार ८५० रुपयांचा गुटख्याचा साठा अपर पोलीस अधिक्षक कार्यालयातील पथकासह जाफराबाद पोलीसांनी संयुक्तरित्या केलेल्या कारवाईत जप्त केला आहे.

यासंदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, अपर पोलीस अधिक्षक विक्रम साळी यांच्या गोपनिय माहिती अन्वये जाफ्राबाद शहरातील बँक ऑफ महाराष्ट्रजवळ एका व्यक्तीने महाराष्ट्र बँकेशेजारील गाळ्यात गुटखा अवैध विक्री करण्यासाठी गुटख्याचा साठा ठेवला आहे. या माहिती आधारे पोलीसांच्या पथकाने संयुक्तरीत्या केलेल्या कारवाईत आरोपी शेख जुबेर शेख आमिन (रा. निमखेडा रोड, जाफ्राबाद) याच्या मालकीच्या गाळयावर धाड टाकून प्रिमियम झेड एन १, जाफरानी जर्दा, प्रिमियम राजनिवास सुंगधित पान मसाला, गोवा १०००, व्ही १ तंबाखू केशर युक्त विमल पान मसाला, हिरा पान मसाला हा एकुण ६ लाख ४१ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल आढळून आल्याने दोन शासकीय पंचासमक्ष जप्त करण्यात आलेला आहे. सदर मुद्देमाल तपासणी होऊन अन्न व औषध प्रशासना मार्फत कायदेशीर कारवाई करीत आहोत.

# ‘उमेद’चे प्रभारी शकील विरुद्धचा चौकशी अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश!

## वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही अहवाल अप्राप्त राहिल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ

**बीड / नवी मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (उमेद) जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड येथे कार्यरत असलेले श्री. शकील सुभान शेख तथा प्रभारी जिल्हा अभियान व्यवस्थापक यांच्याविरुद्ध प्राप्त झालेल्या गंभीर तक्रारींची दखल घेत राज्य शासनाने कडक पावले उचलली आहेत. या प्रकरणाचा चौकशी अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक, जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आले आहेत.**

प्राप्त माहितीनुसार, शिरूर कासार तालुक्यातील संस्था व क्षमता बांधणीच्या तालुका व्यवस्थापक तथा अति. तालुका अभियान महिला व्यवस्थापक यांनी श्री. शकील शेख यांच्या विरोधात शासनाकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रार अर्ज ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या मा. मंत्री महोदयांकडे प्राप्त झाल्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड यांनी यावर तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाच्या पत्रानुसार, जिल्हास्तरावर गठीत तक्रार निवारण समितीमार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी होणे अभिप्रेत होते. परंतु, अनेक महिने लोटूनही अहवाल सादर न झाल्यामुळे तक्रारदार यांनी थेट अवर सचिव, योजना–३, ग्राम विकास विभाग, मुंबई यांच्याकडे दाद मागितली आहे. अवर सचिव श्री. शरद भास्कर गिते यांनी जारी केलेल्या ताज्या स्मरणपत्रामध्ये, संदर्भातील सर्व मुद्द्यांची कसून चौकशी करून लवकरात लवकर अहवाल राज्य कार्यालयाकडे पाठविण्याचे स्पष्ट फरमान काढले आहे. या प्रकरणामुळे बीड जिल्हा परिषदेच्या वर्तुळात आणि ’उमेद’ अभियानामध्ये खळबळ उडाली असून, जिल्हा प्रशासनाकडून आता नेमकी काय कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# पान १ वरून...

## ‘एल निनो’चा शेतीला फटका; ग्रामीण

खरीप हंगामावर होऊ शकतो. विशेषतः तेलबिया आणि कडधान्यांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता असून, यामुळे कृषी क्षेत्रावरील दबाव वाढू शकतो. भारतीय हवामान विभागाने यंदाच्या मॉन्सूनमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील उत्पादन, ग्रामीण उत्पन्न आणि एकूणच अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तथापि, पुरवठा साखळीचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि सरकारकडे उपलब्ध असलेला पुरेसा धान्यसाठा यामुळे संभाव्य अन्नटंचाई किंवा महागाईचा धोका काही प्रमाणात नियंत्रित ठेवता येईल, असेही गव्हर्नर मल्होत्रा यांनी नमूद केले. आवश्यक असल्यास ही बातमी आणखी वृत्तपत्रीय शैलीत किंवा वेब पोर्टलसाठी एसईओ–अनुकूल स्वरूपातही तयार करून देऊ शकतो.

---------

## गृहमंत्री गुन्हेगार, म्हणूनच ते

मल्लिकार्जुन खरगे, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह इंडिया आघाडातील पक्षाचे खासदार सहभागी झाले. विद्यार्थ्यांवर पॅलेट गन चालवण्याचे आदेश कोणी दिले? असा थेट सवाल राहुल गांधी यांनी केला. या मुद्द्यावर गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत येऊन स्वत: उत्तर द्यावे, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली आहे.

---------

## आमच्याकडे शासकीय मेडिकल कॉलेज द्या

महाविद्यालय मंजूर करण्याची मागणी केली. ‘‘आमच्या भागात ऊसतोड मजूर महिलांची संख्या मोठी आहे. त्याचबरोबर कांदा उत्पादक शेतकऱ्यांमुळे शेतीची कष्टाची कामेही मोठ्या प्रमाणावर होतात. त्यामुळे महिलांना कंबरदुखी, गुडघेदुखी तसेच गर्भाशयाच्या आजारांचा सामना करावा लागतो. मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून हजारो गोरगरीब रुग्णांना मदत मिळाली आहे. मात्र मतदारसंघात वैद्यकीय महाविद्यालय झाल्यास आरोग्यसेवेला मोठी चालना मिळेल,‘‘ असे त्यांनी सांगितले. या महाआरोग्य शिबिरात विविध आजारांसाठी सुमारे ६० हजारांहून अधिक रुग्णांची नोंदणी झाली असून, एक लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी शिबिराचा लाभ घेण्यासाठी उपस्थिती लावल्याचा दावा आयोजकांनी केला. विशेषतः मणक्याचे विकार, सांधेदुखी आणि नेत्ररोगांसाठी मोठ्या प्रमाणावर रुग्ण दाखल झाले. यावेळी उपस्थित असलेले ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने म्हणाले, ‘‘आमदार सुरेश धस हे माझे जुने मित्र असून ते सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत असतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हे मोफत महाआरोग्य शिबिर समाजासाठी प्रेरणादायी आहे.‘‘ डॉ. लहाने यांनी नागरिकांना मोबाईलच्या अतिवापराबाबत सावध राहण्याचे आवाहन करताना सांगितले की, ‘‘लहान मुलांना विशेषतः पाच ते सहा वर्षांखालील मुलांना मोबाईलपासून दूर ठेवले पाहिजे. मोबाईलचा अतिवापर भविष्यात डोळ्यांच्या गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकतो.‘‘ मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून राज्यातील लाखो रुग्णांना विविध उपचारांसाठी मदत मिळाली असून अनेक गंभीर शस्त्रक्रियांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध झाले आहे. आष्टीतील हे महाआरोग्य शिबिर आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण समाजोपयोगी उपक्रम ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी पद्मभूषण डॉक्टर रमाकांत पांडा साहेब४ हृदयरोग तज्ञ कक्ष शैली चिकित्सा पद्मश्री तात्याराव लहाने साहेब येत असतात रामेश्वर भाऊ नाईक कक्ष प्रमुख सीएम एफ आर डॉक्टर रितेश पाटील साहेब सी एम आर एफ समन्वयक राज्य माजी आमदार साहेबराव तळेकर नाना महंत विठ्ठल महाराज सौ प्राजक्तताई सुरेश धस, यांचा आजिनाथ महाराज शास्त्री पंत राधाताई सानप मिराबाई संस्था संतोष महाराज वरणकर विठ्ठल रुक्मिणी संस्था त्रिवेका आनंद शास्त्री पद्मावती संस्थान मंठ रामकृष्ण रंधवे बापू संतोष जीवांकर वसंतराव सानप, काकडे सरपंच परिषद अध्यक्ष श्री गुप्ता साहेब आयएएसपी आरोपी बीड धार्मिक साहेब ॲडिशनल कलेक्टर श्री जाधव साहेब एडिशनल सीओ झेडपी बीड डॉक्टर सतीश सोलंकी साहेब जिल्हा सह्याद्री सर बीड डॉक्टर उल्हास गंडाळ जिल्हा वैद्यकीय अधिकारी एडवोकेट साहेबराव मस्के युवा नेते जयदत्त भैय्या धस राधेश्याम धस सरपंच जामगाव चंपावती काकी पानसंबळ नगराध्यक्ष जिया भाई पाटोदा नगर अध्यक्ष दिपाली राजेंद्र जाधव, जि.प.सदस्य माऊली अप्पा जरांगे,बाळासाहेब केंदार, खेडकर,सुरेस उगलमुगले, रोहिदास गाडेकर शिरूर नगराध्यक्ष बेग माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, गणेश नाना शिंदे माऊली आप्पा जरांगे सुनील आबा वारंगुळे, सभापती, नगरसेवक शरीफ शेख, सरपंच अशोक मुळे, सचिन लोखंडे, आदी उपस्थित होते.

------------

## सुनील तटकरे यांनी धनंजय

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना ‘गुंगी गुडिया’ असं संबोधल्याने राजकीय वाद निर्माण झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने या टिप्पणीचा निषेध केला असून काँग्रेसच्या कुलाबा येथील गांधी भवन या कार्यालयात धडक देऊन, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माफी मागावी, अशी मागणी केली. दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर पक्षांनीही काँग्रेसच्या या टीकेचा समाचार घेतला. मात्र हा वाद सुरू झाला तो राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे यांच्या एका कृतीमुळे. सुनेत्रा पवार या बीड दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेवेळी एका पत्रकाराकडून सुनेत्रा पवारांना कायदा–सुव्यवस्थेबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र धनंजय मुंडे यांनी त्या पत्रकाराला प्रश्न विचारण्यापासून रोखलं. हाच व्हिडिओ समोर आल्यानंतर काँग्रेसने सुनेत्रा पवारांवर ‘गुंगी गुडिया’ म्हणत टीका केली होती. धनंजय मुंडेंच्या या कृतीवर आता राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही नाराजी व्यक्त केली आहे.

--------

## खा.सोनवणेंच्या मुलाला अटक

की आज माझा मुलगा जाऊन ४० दिवस झाले, मात्र अद्याप न्याय मिळाला नाही. पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली नाही. आम्ही न्याय मिळावा म्हणून मुंबईत निवेदन देण्यासाठी ६ दिवस थांबलो. मात्र प्रशासनाने दखल घेतली नाही. तुम्ही दुसऱ्या १०० जणांना अटक केली तरी काय उपयोग, तुम्ही मुख्य आरोपीला आणखी आम्हाला मारायला बाहेर ठेवलय का ? असा सवाल मयत विलास घुलेच्या आईने केलाय. जर आरोपीला अटक झाली नाही, आम्हाला न्याय मिळाला नाही तर आम्ही सर्व कुटुंब आत्महत्या करू, असा टोकाचा इशारा देखील त्यांनी दिलाय.मयत विलास घुलेचे भाऊ रमेश घुले म्हणाले आहेत, की मी अनेक वेळा सांगितलंय माझा भाऊ जखमी असताना त्याने सौरव सोनवणे याचे नाव घेतले आहे. त्यानेच हे करायला सांगितलं अस विलास म्हणाला. जे साक्षीदार आहेत त्यांनी देखील आपल्या जबाबात नाव दिली आहेत. मग पोलिस का कारवाई करत नाहीत. यांना आम्ही मेल्यावर जग येणार का ? असा संतप्त सवाल देखील यावेळी रमेश घुले यांनी केला असून न्याय न मिळाल्यास आम्ही आत्महत्या करू, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे .

----------

## राष्ट्रवादीने रुपाली चाकणकरांचा

निवड अनेक अर्थाने महत्त्वाची ठरली असल्याचे बोलले जात आहे. अशातच गेल्या २६ वर्षांचा हा प्रवास आहे. पंचायत समिती सदस्य, महानंद दूध डेअरी चेअरमन, पुणे जिल्हा राष्ट्रवादी महिला अध्यक्षपद, असे १४ वर्षे काम करण्याची संधी मिळाली. यापुढची मोठी जबाबदारी समजून काम आता करायला हवे, अशी प्रतिक्रिया वैशाली नागवडे यांनी दिली.महिला प्रदेशाध्यक्षा वैशाली नागवडे यांच्याबद्दल सांगायचे तर ११ फेब्रुवारी १९७३ रोजी जन्मलेल्या नागवडे यांचे शिक्षण बी. कॉम पर्यंत झाले असून त्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळावर संचालक म्हणून आहेत. सोबतच महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) येथेही संचालकपद भूषविले आहे. दौंड पंचायत समिती सदस्याही होत्या.२००९ ते २०२१ पर्यंत पुणे जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली होती.

-----------

## वृत्तांकनाच्या ऑडिओ–व्हीडीआ

थेट प्रक्षेपण (लाइव्ह स्ट्रीमिंग) आणि ध्वनिचित्रमुद्रण (रेकॉर्डिंग) यासंबंधी दाखल करण्यात आलेल्या याचिकांच्या सुनावणीदरम्यान हे स्पष्टीकरण दिले.२४ जुलै रोजी दिलेल्या अंतरिम आदेशातील परिच्छेद ११ संदर्भात काहीसा संभ्रम अद्याप कायम आहे असे न्यायालयाच्या निदर्शनास आल्यानंतर हे स्पष्टीकरण देण्यात आले. त्या परिच्छेदात सुनावणीतील क्लिप्स शेअर करण्यावरील निर्बंधामुळे मान्यताप्राप्त वृत्तसंस्थांच्या वृत्तांकनावर बंदी येणार नसल्याचे नमूद करण्यात आले होते. हा संभ्रम दूर करताना खंडपीठाने म्हटले, या परिच्छेदातून हे स्पष्ट होते की, मान्यताप्राप्त वृत्तसंस्थांनी न्यायालयीन कामकाजाचे वृत्तांकन करण्यावर सर्वंकष बंदी घालण्याचा या आदेशाचा कोणताही उद्देश नाही. मान्यताप्राप्त वृत्तसंस्था न्यायालयीन कामकाजाचे वृत्तांकन करू शकतात आणि कायदेशीर घडामोडी तसेच न्यायालयीन निर्णय३ंची माहिती जनतेपर्यंत पोहोचवू शकतात, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र, अशा वृत्तांकनात न्यायालयीन कामकाजातील ऑडिओ किंवा व्हीडीओ क्लिप्सचा वापर करता येणार नाही, यावर न्यायालयाने भर दिला.आदेशात म्हटले आहे वृत्तसंस्था न्यायालयीन कामकाजाचे वृत्तांकन सुरू ठेवू शकतात आणि कायदेशीर घडामोडी तसेच न्यायालयीन निर्णयांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवू शकतात. मात्र, अशा वृत्तांकनात न्यायालयीन कामकाजातील ऑडिओ किंवा व्हीडीओ क्लिप्सचा वापर करता येणार नाही. ‘थोडक्यात, वृत्तसंस्थांना न्यायालयीन कामकाजाचे वृत्तांकन करण्याची मुभा कायम राहील. मात्र, त्यांना १० व्या परिच्छेदातील निर्बंधांचे पालन करावेच लागेल.

-----------

## आता तर विधिमंडळ पक्ष

सांगितले की, निवडणूक चिन्ह हे राजकीय पक्षाचे असते, विधिमंडळ पक्षाचे नाही. कारण निवडणूक आयोग पक्षाला चिन्ह देतो. पक्षाने अधिकृत पत्र दिल्याशिवाय कोणीही उमेदवारी अर्ज भरू शकत नाही. आमदारांनी भाजपशी हातमिळवणी करून सरकार पाडले. एकनाथ शिंदेंनी स्वतः सांगितले होते की त्यांना एका मोठ्या राष्ट्रीय पक्षाचा पाठिंबा आहे. ज्या पद्धतीने सरकार पाडले गेले आणि नवे सरकार स्थापन झाले, ते लोकशाहीच्या भविष्यासाठी अत्यंत गंभीर आहे. अशा पद्धतींमुळे निवडणुकीतील जनादेशच निरर्थक ठरतो आणि जनतेने निवडून दिलेले सरकार सत्तेत राहत नाही.‘‘नवीन अध्यक्षांनी (राहुल नार्वेकर) पदभार स्वीकारताच एकनाथ शिंदे यांना गटनेता आणि भरत गोगावले यांना प्रतोद म्हणून मान्यता दिली. या प्रक्रियेत कायदेशीर नियमांचे पालन झाले नाही. अपात्रतेच्या नोटिसांना २०२३ मध्ये उत्तरे दिली गेली. जर लवाद म्हणून अध्यक्ष वेळेत निर्णयच घेणार नसतील, तर दहाव्या अनुसूचीचा काय उपयोग? या संपूर्ण बेकायदेशीर पायावर बनलेल्या सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला.नवीन अध्यक्षांनी (राहुल नार्वेकर) पदभार स्वीकारताच एकनाथ शिंदे यांना गटनेता आणि भरत गोगावले यांना प्रतोद म्हणून मान्यता दिली. या प्रक्रियेत कायदेशीर नियमांचे पालन झाले नाही. अपात्रतेच्या नोटिसांना २०२३ मध्ये उत्तरे दिली गेली. जर लवाद म्हणून अध्यक्ष वेळेत निर्णयच घेणार नसतील, तर दहाव्या अनुसूचीचा काय उपयोग? या संपूर्ण बेकायदेशीर पायावर बनलेल्या सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला.कपिल सिब्बल सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, शिवसेना ही निवडणूक आयोगाकडून मान्यताप्राप्त राजकीय पक्ष होता. बाळासाहेब ठाकरेंनंतर उद्धव ठाकरेंनी नेतृत्व स्वीकारले आणि उपनेत्यांची निवड केली. पक्षाच्या घटनेतील कलम ११अ नुसार ही माहिती निवडणूक आयोगाला देण्यात आली होती. परंतु, निवडणूक आयोग म्हणतो की २०१८ ची घटना त्यांच्या रेकॉर्डवर नाही. उद्धव ठाकरे यांची बिनविरोध निवड झाली होती आणि त्यांनी एकनाथ शिंदे यांची ’नेता’ म्हणून नियुक्ती केली. दोन्ही बाजू हे मान्य करतात की, ज्या घटनेअंतर्गत या नियुक्त्या झाल्या, ती घटना कोणीही आव्हान दिलेली नाही, २०१९ ते २०२२ दरम्यान उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते आणि शिंदे कॅबिनेट मंत्री होते. त्यांनी कधीही २०१३ किंवा २०१८ च्या घटनेवर प्रश्न उपस्थित केला नाही.असे सिब्बल बाजू मांडताना म्हणाले.

-----------------

## नोटीस

**मा.श्री.कृष्णराव के.पाटील, सह दिवाणी न्यायाधीश,व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४२/२०२६**

अर्जदारः १) लताबाई भ्र गोवर्धन लांडे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. घाटसावळी, ता.जि. बीड, २) निलावती भ्र भिमराव शेंडगे, वय ३४ वर्षे, धंदा नोकरी, रा. माउली निवास, भोसरी पुणे ता. जि. पुणे, ३) दत्ता पि गोवर्धन लांडे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. घाटसावळी, ता.जि. बीड, ४) शितल भ्र अशोक लांडे, वय ३५ वर्षे धंदा घरकाम, रा. घाटसावळी, ता.जि. बीड, ५) प्रांजली पि अशोक लांडे, वय ९ वर्षे धंदा शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार नं ४ रा सदर, ६) आदित्य पी अशोक लांडे, वय १२ वर्षे,धंदा शिक्षण अ.पा.क. आई अर्जदार क्र. ४ रा.सदर

**विरुध्द**
**गैरअर्जदार–निरंक कोणीही नाही**
**अर्जदार हे भारतीय आहेत.**
**प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे गोवर्धन पि सोपानराव लांडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे गोवर्धन पि सोपानराव लांडे, रा. घाटसावळी ता.जि.बीड हे दिनांक ०४/०४/२०२६ रोजी राहते घरी मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार नं २ मयताची विविाहीत मुलगी आहे. अर्जदार नं. ३ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार नं ४ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी आहे. अर्जदार नं ५ ही मयताची नात व अर्जदार नं ६ मयताचा नातु आहे. यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील दिनांक ११/०८/२०२६**

आज दिनांक ०५/०८/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरुन,**
**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.**

**स्वाक्षरीत**
**व.लि.**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ०६ ऑगस्ट २०२६
३

## थोडक्यात

### पाटोदा तालुक्यातील रुग्णांची हेळसांड; आरोग्य कर्मचाऱ्यांची आष्टी येथे उपस्थिती

पाटोदा । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरासाठी पाटोदा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतील मोठ्या संख्येने डॉक्टर, परिचारिका व इतर आरोग्य कर्मचारी उपस्थित राहिल्याने तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये कर्मचारी उपलब्ध नसल्याने उपचारासाठी आलेल्या रुग्णांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. काही ठिकाणी रुग्णांना उपचार न मिळाल्याने खासगी दवाखान्यांचा आधार घ्यावा लागत असून त्यांचा आर्थिक भार वाढत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी आरोग्य विभागाने अशा विशेष कार्यक्रमांचे नियोजन करताना स्थानिक आरोग्य सेवा विस्कळीत होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी केली आहे. तसेच प्रत्येक आरोग्य केंद्रात किमान आवश्यक कर्मचारी उपलब्ध ठेवून रुग्णसेवा अखंड सुरू ठेवावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

### नाथ हायस्कूल नाथापूरचे मु.अ. साळवे के. व्ही.यांचा सेवापुर्ती कार्यक्रम संपन्न



नाथापूर । प्रतिनिधी

नाथ हायस्कूल नाथापूरचे मु.अ. श्री . साळवे के. व्ही.यांचा सेवापुर्ती कार्यक्रम संपन्न या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद गटनेते तथा संस्थापक अध्यक्ष श्री .मदनरावजी चव्हाण हे होते तसेच कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने शाळेतील विद्यार्थिनी कुमारी गांडगे श्रावणी, करांडे गायत्री, शिनगारे प्रीती यांनी केले. प्रथम प्राध्यापक रोडे सर श्री बागल सर मुख्याध्यापक मगर सर श्री जाधव सर मु .अ. तालखेड यांनी साळवे सरांना शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले शेवटी शाळेतर्फे प्रधान भाऊसाहेब यांनी शुभेच्छा दिल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात माननीय श्री . मदनरावजी चव्हाण भाऊ यांनी साळवे सरांना शुभेच्छा दिल्या व त्यांच्या उत्तम कार्याचे कौतुक केले.या प्रसंगी मूकबधिर विद्यालय नेकनुर चे मुअ . फुलचंद लुचारे तसेच सेवानिवृत्त शिक्षक श्री हुरकुडे सर , गिराम सर (वार्ताहार) नागरगोजे सर यांनी शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमासाठी नाथ जुनिअर कॉलेजचे प्राचार्य गोविंद चव्हाण तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते तसेच साईनाथ मतिमंद विद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिंदे रामेश्वर सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री तांबे सर यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन शिंदे सर यांनी मानले या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षक श्री सागडे दिलीप सर शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका शाळेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच मित्र कंपनी कुटुंबातील सर्व नातेवाईक उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी डॉक्टर खळगे ,मा.जि. सदस्य श्री .खळगे साहेब सदस्य,बौद्ध महासभा अध्यक्ष श्री निकाळजे प्राध्यापक बागुल सर , तुरुकमारे फौजी या गावातील प्रतिष्ठित सर्व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## बालस्नेही महाराष्ट्र घडविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे -अॅड.संजय पुराणिक

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष अॅड. संजय विष्णू पुराणिक तसेच आयोगाच्या सदस्यांनी बुधवारी बीड येथील एचआयव्ही बाधित बालकांच्या विशेष बालगृहाला भेट देऊन तेथील सुविधा व व्यवस्थेची पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात दिवसभर बाल हक्क संरक्षणाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. एकूण १८ प्रकरणांवर सुनावणी झाली असून त्यापैकी १० प्रकरणे निकाली काढण्यात आली, तर उर्वरित प्रकरणांबाबत आवश्यक निर्देश देण्यात आले. सुनावणीनंतर आयोगाने जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.**



यावेळी आयोगाच्या सचिव (अतिरिक्त कार्यभार) वंदना पु. जैन, सदस्य गीतांजली बाळाजी बुटी, शुभांगी संजय तांबट, संजय निळकंठराव लहाकेपाटील, अतुल आनंदराव देसाई, प्रवीण संजाबराव भुजाडे, मिलन देवेंद्र जंगम, कनिष्ठ काळजी वाहक अजय लोंढे, परिविक्षा अधिकारी उज्वला होवाल, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शेख फारुख तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष ड. पुराणिक यांनी बालस्नेही महाराष्ट्र घडविण्यासाठी बालहक्क संरक्षणाशी संबंधित सर्व विभागांनी प्रभावी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता व्यक्त केली. बैठकीत पॉक्सो प्रकरणांतील अडचणी, मनोधैर्य योजनेतील प्रलंबित प्रकरणे, महिला हेल्पलाईन १०९८ व आपत्कालीन सेवा ११२ यांच्यातील समन्वय, बालविवाह प्रतिबंध, विशेष बाल पोलीस पथक, 'पोलीस काका-दीदी' उपक्रम तसेच बाल संरक्षण समित्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.

शाळा व महाविद्यालयांमध्ये सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण, मुलींसाठी पिंक रूम, कार्यान्वित 'सखी-सावित्री संवाद पेटी', स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, सुरक्षित वाहतूक व सुरक्षाविषयक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच बीड जिल्ह्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी शिक्षण हमी कार्डाचा वापर, स्थलांतरित मुलांचा पाठपुरावा, बालविवाह रोखल्यानंतर संबंधित मुलींच्या शिक्षणावर लक्ष ठेवणे तसेच सलग अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची गृहभेट घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.

बालमजुरी प्रतिबंधासाठी कामगार विभागाने सतर्क राहावे, स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी हंगामी वसतिगृहे उपलब्ध करावीत तसेच अनाथ बालकांना आवश्यक कागदपत्रे व अनाथ प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचनाही आयोगाने दिल्या. राज्यातील 'बालस्नेही पंचायत' अभियानासाठी निवडलेल्या १०० गावांमध्ये बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील पिंपळगाव, बीड तालुक्यातील बोरफडी आणि धारूर तालुक्यातील हिंगणी या गावांची निवड झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती जि.प शाळेत मोठ्या उत्साहात साजरी

चौसाळा । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांची जयंती व बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यानिमित्त शाळेत सांस्कृतिक विभाग प्रमुख लक्ष्मण राऊत व शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजां हंम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये सर्वप्रथम शाळेच्या प्रांगणामध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सर्व शिक्षक बंधू भगिनींनी अभिवादन केले त्यानंतर साहित्यरत्न अण्णाभाऊ यांचे कार्य याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले त्यानंतर शाळेतील बालगंधर्व सांस्कृतिक सभागृह येथे निबंध स्पर्धेचे सुरुवात झाली यावेळी मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हम्पे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ शिक्षक सुभाष काकड, महारुद्र झोडगे,योगानंद गांधले,उषा माने, शालिनी काकडे



हे उपस्थित होते त्यानंतर वकृत्व स्पर्धेला सुरुवात झाली वकृत्व स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी पहिली ते चौथी छोटा गट परीक्षक म्हणून शाळेतील शिक्षक श्रीमती मोहर जोगदंड,शकुंतला तांबडे,उज्वला वस्तारे,पाचवी ते सातवी मध्यम गटाचे परीक्षक म्हणून श्री सुग्रीव तांदळे,उद्धव घोडके,ज्ञानेश्वर मस्के,तर आठवी ते दहावी मोठ्या गटा चे परीक्षक म्हणून संतोष परतापुरे,विजय कोळेकर,विनायक तोताडे, तर तिन्ही गटाचे एकूण संकलन श्री वैभव शिंदे केले तर स्पर्धेची बेलव्यवस्थापक म्हणून भागवत नाडे यांनी व्यवस्थापन केले,प्रत्येक गटातून प्रथम द्वितीय तृतीय असे क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट रोजी बक्षीस वितरण करण्यात येणार आहे असे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लक्ष्मण राऊत यांनी सांगितले, पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा आपल्या भाषणातून उल्लेख केला तसेच वंचित दलित आणि कष्टकरी यांची व्यथा आपल्या लेखनातून मांडली तसेच दीड दिवस शाळा शिकलेल्या व्यक्तीने जागतिक दर्जाचे लिखाण, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा रशियात गाणारे ते पहिले भारतीय ठरले, केल्याचे विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला आजच्या पिढीला त्यांच्या विचाराची गरज आहे असेही विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणात म्हटले तर बैठक व्यवस्था सुरेश गोरे यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन दहावीचे वर्गशिक्षक श्री विनायक तोताडे व विद्यार्थ्यांनी केले यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवंद उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### ब्रह्माकुमारीच्या वतीने व्यसनमुक्ती

आले आहे. राजयोग ध्यानाचा नियमित सराव, सकारात्मक विचार, आत्मसंवाद, मूल्याधिष्ठित जीवनशैली आणि सत्संग यांच्या माध्यमातून व्यसनमुक्त जीवन जगण्याची प्रेरणा दिली जाणार असल्याचेयांनी सांगीतले. ब्रह्माकुमारीज मेडिकल विंगने सर्व शैक्षणिक संस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, युवक मंडळे तसेच सर्व नागरिकांना या राष्ट्रीय जनआंदोलनात सहभागी होऊन व्यसनमुक्त, निरोगी,

### माजलगावातील अतिक्रमण

पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी,छत्रपती संभाजी महाराज चौक ते मौलाना आझाद चौक या मार्गालगत व्यवसाय करणारे छोटे-मोठे व्यापारी,फळ विक्रेते आणि फेरीवाल्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून त्यांचे पुनर्वसन केल्यानंतरच अतिक्रमण हटविण्याची कारवाई करावी, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.त्याचप्रमाणे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अचानक कारवाई झाल्यास गोरगरीब व्यापाऱ्यांचे जनजीवन विस्कळीत होऊ शकते. त्यामुळे पुनर्वसनाची व्यवस्था आणि पर्यायी जागा निश्चित होईपर्यंत अतिक्रमणावरील कारवाई स्थगित ठेवावी,अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान,या मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन योग्य निर्णय घ्यावा. अन्यथा आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीस संबंधित प्रशासनावर राहील,असा इशाराही पक्षाच्या च्या वतीने देण्यात आला आहे.

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक तालुकाध्यक्ष गोविंद कराड, नगरसेवक दीपक मुंडे, लक्ष्मण उर्फ पिंटू मुरकुटे, भीमराव डावरे, जयराज देशमुख, अजीज कच्वी, माजी नगरसेवक शकील भाई कुरेशी, सामाजिक न्याय तालुका अध्यक्ष दत्ताभाऊ सावंत, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र परदेशी, रमेशअण्णा भोईटे, शंकर कापसे, दीपक कुरील,अजीम नवाब, रवी मुळे, एजासभाई, सुरेश नानवटे, शिवराज सुरवसे चंद्रप्रकाश हालगे, अजगर मणियार, राजूभाई मेकानिकल, तक्की खान, अली खान, जुबेर कच्वी, शंकर घोडके, विश्वजीत कांबळे, विलास जुनाळ, शुभम आवाड, गिरीश भोसले यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

### चेक बाऊन्स प्रकरणात

पक्षाने धनादेश केवळ सुरक्षेसाठी दिला होता असा युक्तिवाद करत विविध आक्षेप नोंदवले. परंतु, ड. तेजस नेहरकर यांनी सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या विविध दाखल्यांचा आधार घेत बचाव पक्षाचे सर्व युक्तिवाद मोडून काढले. आरोपीकडे आपल्या दाव्याच्या समर्थनासाठी कोणताही विश्वासार्ह पुरावा नसल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्या नंतर ड. नेहरकर यांची मुद्देसूद मांडणी आणि सबळ पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत ४ ऑगस्ट २०२६ रोजी पुढीलप्रमाणे कठोर शिक्षा सुनावली:

सश्रम कारावास: आरोपीस ६ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. आरोपीने फिर्यादीस ९,९६,०००/- ची भरपाई ६० दिवसांच्या आत अदा करावी. ही भरपाईची रक्कम न भरल्यास आरोपीस आणखी ३ महिने साधा कारावासाची शिक्षा भोगावी लागेल. अॅड. तेजस सुभाष नेहरकर यांच्या अभ्यासू, संयमी आणि कायदेशीर कौशल्यामुळे बीडमधील प्रसिद्ध सोन्याच्या व्यापाऱ्यास अखेर न्याय मिळाला. या संपूर्ण प्रकरणात त्यांना ड. गौतम जी. नाईकवाडे, अॅड. इम्रान पटेल, अॅड. रविराज व्ही. राठोड, अॅड. दत्ता केसकर, अॅड. सिकंदर शेख, अॅड. संतोष शेंडगे आणि अॅड. दत्ता खांडेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे धनादेश देऊन फसवणूक करणाऱ्यांविरोधात व्यापारी वर्गात एक सकारात्मक संदेश गेला असून या निकालाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

### कांगणेवाडीतील माधवबाबा

चांदीचा मुकुट व गळ्यातील३५ हजार रुपयांची सोन्याची साखळी, ४१ हजार ६०० रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र आणि दानपेटीतील ४० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १ लाख ७५ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी मंदिराचे पुजारी अंगद देवराव कांबळे यांच्या फिर्यादीवरून बर्दापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सतिशकुमार सारुळे हे करत आहेत.

### स्व. अजितदादा पवार यांच्या

पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे नियोजन असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या बैठकीस सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेचे संचालक गौतम आगळे तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी आणि संबंधित मान्यवर उपस्थित होते. परळी शहरात उभारला जाणारा हा पुतळा स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याची आठवण जपणारा आणि भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी स्मारक ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### वाहतूक पोलिसांच्या धडक

एकूणच, बीड शहरातील बहुतांश नागरिक वाहतूक पोलिसांच्या या धडक कारवाईबद्दल समाधान व्यक्त करत असून, वैभव पाटील आणि त्यांच्या टीमच्या कार्याचे मनापासून कौतुक करत आहेत.यावेळी किशनसिंग चौहान, बाळासाहेब चिरके, मयूर भालेकर, चव्हाण किशन ,शुभम दोडके, कृष्णा पवने,शुभम सुतार,ऋषी पांडव आदी उपस्थित होते.

## जागरूक पालकत्व हाच समाजाचा आधार -श्रीमती वर्षा मुंडे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भा.शि.प्र संस्था संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित पालक मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्रीमती वर्षा मुंडे म्हणाल्या की,समाजातील आजची परिस्थिती बदलली आहे. स्पर्धा मोठ्या प्रमाणात आहे. शिक्षणासोबत तुमचं कौशल्य हे विद्यार्थ्यांना सक्षम बनवणार आहे म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांना मेहनतीसाठी जागरूक करा.पालकांनी स्वतः जिज्ञासा वृत्ती जोपासली पाहिजे.याप्रसंगी व्यासपीठावर उदघाटक संस्थेचे केंद्रीय सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, शप्राचार्य प्रा.डॉ.मुकुंद देवर्षी,उपप्राचार्य प्रा.अंकुश साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. उदघाटनपर मनोगत व्यक्त करताना



संकुलाचे पालक व केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड म्हणाले की, आजकाल पालक केवळ मुलांकडे चौथीपर्यंत लक्ष देतात त्यानंतर दुर्लक्ष केले जाते हे दुर्दैवी आहे म्हणून आता पुढच्या शिक्षणासाठी पालकांनी सजग होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांची लिखाण क्षमता कमी झाली आहे त्याचा सराव करून घेण्याची पालक व शिक्षक दोघांचीही जबाबदारी आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय कोकड म्हणाले की,पालकांनी दिवसभरात एकदा मुला-मुलीसोबत एकत्र भोजन केले पाहिजे तर त्याच्याशी संवाद वाढेल व कौटुंबिक वातावरण चांगले राहून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल.सुरुवातीस मान्यवरांचा परिचय प्रास्ताविक, अहवाल वाचन उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे यांनी केले.दुसऱ्या सत्रात शिक्षक -पालक संवादात प्राचार्य प्रा डॉ. मुकुंद देवर्षी यांनी महाविद्यालयाच्या भौतिक सुविधा, विविध उपक्रमांची माहिती विशद केली.प्राध्यापकांनी स्वतःचा परिचय व विषयातील संधी पालकांना सांगितली.यावेळी नवनाथ जाधव व प्रभाकर गवळी यांनी पालकांच्या वतीने मनोगत व्यक्त केले.संपूर्ण कार्यक्रमाचे ओघवते सूत्रसंचालन व आभार प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले.या प्रसंगी माता व पिता पालकांची बहुसंख्य उपस्थिती सभागृहात होती.

## कुसळंब येथे दर रविवारी श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती व विनामूल्य मार्गदर्शन उपक्रम सुरू

पाटोदा । प्रतिनिधी

परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व आदरणीय चंद्रकांत दादासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र कुसळंब येथे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या आरतीचा व समाजप्रबोधनाचा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात करण्यात आला.

यापुढे दर रविवारी सायंकाळी ६.३० वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती नियमितपणे होणार असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वामींच्या कृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. आरतीनंतर विविध विषयांवर विनामूल्य मार्गदर्शन या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आरतीनंतर भाविकांना अठरा विभागांतील



जीवनोपयोगी विषयांवर विनामूल्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये सण-उत्सव व हिंदू संस्कृती, कृषी व स्वयंरोजगार, बालसंस्कार, वास्तुशास्त्र, आयुर्वेद, आरोग्य, सामाजिक प्रबोधन तसेच व्यक्तिमत्त्व विकास यांसारख्या विविध विषयांचा समावेश आहे.

समाजप्रबोधनाचा उपक्रम

हा उपक्रम केवळ कुसळंबपुरता मर्यादित नसून राज्य, देश आणि परदेशातील विविध सेवा केंद्रांच्या माध्यमातूनही अशाच प्रकारे सेवा व मार्गदर्शन दिले जात असल्याची माहिती आयोजकांनी दिली. समाजात आध्यात्मिक जागृती, संस्कार आणि सर्वांगीण विकास घडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. तरी तालुक्यातील सर्व भाविक, सेवेकरी व नागरिकांनी दर रविवारी सायंकाळी ६.३० वाजता श्री क्षेत्र कुसळंब येथे आयोजित आरती व मार्गदर्शन कार्यक्रमास उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०४९
दिनांक - ०४/०८/२०२६

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **गिरीश अनिल मिस्त्री** रा. एकलहेरा ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **वडिलाच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | अनिल राजाराम मिस्त्री | वडील | ०७/०४/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११२३
दिनांक - ०५/०८/२०२६

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **संतोष देविदास बोबडे** रा. कर्जत ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलगी च्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | स्वरा संतोष बोबडे | मुलगी | ०४/०४/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

## शेतकऱ्यांना भेदभाव न करता सरसगट दोन लाखाचे अनुदान द्या :- प्रा आंधळे

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाने कर्जमाफी करताना नियमितपणे पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यावर अन्याय केलेला असून थकबाकीदार शेतकऱ्याप्रमाणेच नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत अनुदान द्यावे अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात बबनराव यांनी आंधळे यांनी म्हटले आहे की अनेक शेतकऱ्यांनी शासनावरील विश्वास कायम ठेवत आणि आर्थिक व्यवहार सुरळीत राहावेत या उद्देशाने दरवर्षी ३१ मार्चपूर्वी पीक कर्जाची नियमित परतफेड केली आहे अनेकांनी सावकाराकडून पैसे उधार घेऊन किंवा सोने गहाण ठेवून ही बँकेचे कर्ज वेळेवर भरलेले आहे मात्र शासनाने कर्जमाफीच्या धोरणात नियमित कर्जदार शेतकऱ्यांना वगळून त्यांच्यावर अन्याय केलेला आहे त्यांनी सांगितले की शासनाने थकीत कर्जदार शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केलेली आहे तर नियमित कर्ज मिळणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ पन्नास हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे हा निर्णय प्रमाणिकपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक असून शासनानेच प्रामाणिक शेतकऱ्यांशी दुजाभाव केल्याची भावना निर्माण झाली आहे बबनराव आंधळे यांनी राज्य सरकारला आवाहन करताना म्हटले आहे की, नियमित कर्ज फेडणारे शेतकरी हे शासनाच्या आर्थिक शिस्तीला हातभार लावणारे आहेत त्यामुळे अशा शेतकऱ्यांच्या प्रमाणिकपणाचा आणि आर्थिक अडचणीचा विचार करून त्यांनाही थकबाकीदार शेतकऱ्याप्रमाणेच दोन लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान द्यावे राज्य सरकारने नियमित कर्जदार शेतकऱ्याबाबतच्या निर्णयाचा फेरविचार करून थकबाकीदाराप्रमाणेच नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपये अनुदान जाहीर करावे अशी मागणी प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.

# देशातील पहिला टी २ टी जीनोम विकसित; तूर उत्पादन वाढीसाठी होणार फायदा!

पुणेः भारतीय कृषी संशोधन परिषदने (आयसीएआर) 'आशा' या तुरीच्या वाणाचे 'टेलोमिअर-टू-टेलोमिअर' (टीटी) जीनोम विकसित केले आहे. देशातील पूर्णपणे विकसित करण्यात आलेले हे पहिलेच 'टीटी' जीनोम आहे. या संशोधनामुळे अधिक उत्पादन देणारे, हवामान बदल अनुकूल, रोगप्रतिकारक्षम आणि अधिक पोषणमूल्य असलेली तुरीची नवे वाण विकसित करणे अधिक सोपे होणार आहे, असे आयसीएआरने निवेदनात स्पष्ट केले.

आयसीएआरने दिलेल्या माहितीनुसार, 'आशा' वाणाच्या संपूर्ण जीनोमचा अभ्यास करून त्याचा अचूक नकाशा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये तुरीच्या सर्व ११ गुणसूत्रांची माहिती अचूकपणे समाविष्ट करण्यात आली आहे. या संशोधनाची नोंद जागतिक जैविक माहितीमध्ये करण्यात आली आहे. या संशोधनातून तुरीतील ३६ हजारांहून अधिक जनुकांची ओळख पटली आहे. त्यामुळे कोणते जनुक कोणता गुणधर्म नियंत्रित करते, हे शास्त्रज्ञांना अधिक अचूकपणे समजणार आहे. तसेच या डीएनए नकाश्याची अचूकता ९९.९ टक्क्यांहून अधिक असल्याने तो



अत्यंत विश्वासार्ह मानला जात असल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले आहे. तूर हे भारतातील प्रमुख कडधान्य पीक असून प्रथिनांचा महत्त्वाचा स्रोत आहे. आता संपूर्ण जीनोम उपलब्ध झाल्यामुळे शास्त्रज्ञांना तुरीतील उत्पादन वाढवणे, रोगप्रतिकारक क्षमता वाढवणे, हवामान बदल अनुकूल गुणधर्म शोधणे अधिक सोपे होणार आहे. याआधारे आण्विक पैदास आणि जीनोम संपादन या आधुनिक तंत्रांचा वापर करून नवीन वाण विकसित करण्याचा वेग वाढेल. त्यामुळे भविष्यात कमी खर्चात अधिक उत्पादन देणारे आणि शेतकऱ्यांसाठी फायदेशीर तुरीचे वाण उपलब्ध होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २०११ मध्ये दिल्लीतील आयसीएआरच्या नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर प्लांट बायोटेक्नॉलॉजीने (एनआयपीबी) 'आशा' या तुरीच्या वाणाचा जगातील पहिला मसुदा जीनोम प्रसिद्ध केला होता. देशात विकसित झालेला पिकाचा पहिला जीनोम होता. त्यानंतर २०१७ मध्ये सुधारित मसुदा जीनोम प्रकाशित करण्यात आला. आता प्रथमच पूर्ण 'टीटी' जीनोम विकसित करण्यात यश आले आल्याचे आयसीएआरने सांगितले आहे. दरम्यान, केंद्र सरकारने २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीसाठी 'आत्मनिर्भर कडधान्य अभियान' सुरू केले आहे. देशात कडधान्यांचे उत्पादन वाढवणे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर तुरीच्या संपूर्ण जीनोमचे यशस्वी नकाशांकन हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. आयसीएआरच्या मते, या संशोधनामुळे तूर सुधार कार्यक्रमाला गती मिळेल, शास्त्रज्ञ आणि वनस्पती पैदास तज्ज्ञांना नवीन वाण विकसित करणे सोपे होईल आणि त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना तसेच देशाच्या अन्न व पोषण सुरक्षेला होईल.

## शेळीपालनासाठी जमनापुरी जात सर्वाधीक फायद्याची

राज्यात डेअरी व्यवसायानंतर शेतकरी अनेक भागांमध्ये शेळीपालन व्यवसायाला प्रकर्षाने महत्व देतात. दुग्ध व्यवसायाच्या तुलनेत शेळीपालनास कमी खर्च येतो. तसेच शेळीपालन कमी जागेतही करता येते. त्यामुळेच शेळीला ग्रामीण भागात 'गरिबांची गाय' असे म्हटले जाते. सध्याच्या घडीला मांसाला अधिक मागणी असल्याने, शेळीपालन व्यवसायाचे महत्व देखील वाढले आहे. देशात एकूण ३७ हुन अधिक शेळ्यांच्या प्रजाती आढळतात. त्यापैकी शेळीपालनासाठी सर्वाधिक पाळली जाणारी जात म्हणजे 'जमुनापारी शेळी' होय. या शेळीच्या पालनातून तुम्ही मोठ्या प्रमाणात आर्थिक नफा कमवू शकतात. विशेष म्हणजे शेतकऱ्यांमध्ये जमुनापारी शेळीची शेळीपालन व्यवसायासाठी मोठी क्रेझ आहे. ज्यामुळे शेळीपालन व्यवसाय करताना शेतकरी शेळीची ही प्रजाती निवडण्यास अधिक प्राधान्य देतात.

जमुनापारी शेळी : जमुनापारी शेळी ही भारतातील यमुना नदीच्या आसपासच्या क्षेत्रांमध्ये अधिक पाळली जाते. ज्यामुळे तिला जमुनापारी असे नाव पडले आहे. या जातीच्या शेळ्या प्रामुख्याने भारतातील पंजाब, हरियाणा, राजस्थान, बिहार आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये सर्वाधिक आढळतात. या शेळीच्या पालनातून शेतकऱ्यांना अधिक मांस आणि दुधाचे उत्पादन मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या प्रजातीची निवड केल्यानंतर सर्वप्रथम एक चांगल्या शेडची उभारणी करावी. शेळीपालनासाठी शेड उभारताना हवा खेळती राहील. याची काळजी घ्यावी. शेळीपालन व्यवसायासाठी कमीत कमी ८ ते १२ वर्ग फूट इतकी जागा आवश्यक असते.

'या' जातीची वैशिष्ट्ये : जमुनापारी



शेळी ही आपल्या एकूण जीवन काळात १३ ते १५ पिल्लांना जन्म देते. या शेळीचे वजन हे इतर प्रजातींपेक्षा अधिक असते. या प्रजातीच्या शेळीच्या एका बोकडाचे वजन ७० ते ९० किलो इतके असते. तर मादी शेळीचे वजन हे ५० ते ६० किलो इतके असते. जमुनापारी शेळीच्या दुधामध्ये मोठ्या प्रमाणात खनिजे आणि सॉल्टचे प्रमाण असते. ही शेळी दररोज २ ते ३ लिटर दूध देते. तसेच तिच्या दुधामध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात.

अशी ओळखतात जमुनापारी शेळी : अनेकदा जमुनापारी शेळी खरेदी करताना शेतकऱ्यांसोबत धोखाधडी होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या शेळीची ओळख पटवताना पुढील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. या शेळीचा रंग हा पांढरा असतो. या शेळ्यांच्या पाठीवर लांब केस आणि छोटे शिंग असतात. या प्रजातीच्या शेळीचे कान मोठे आणि काहीसे दुमडलेले असतात. शेळीची ही जात काहीशी लांब आणि उंच असते. या प्रजातीच्या एका शेळीची किंमत ही जवळपास १५ ते २० हजार इतकी असते.

## पावसाळ्यात चारा साठवणुकीचे नियोजन

बहुतेक ठिकाणी खरीप, रब्बी हंगामात हिरवा चारा उपलब्ध होतो. त्यामुळे जानेवारीपासून पुढे तो जूनपर्यंत जनावरांना हिरवा चारा नसतो. हिरवी वैरण सुकवून ठेवली किंवा मुरघास तयार करून तो चारा टंचाई असताना वापरू शकतो. हिरवा चारा योग्य वेळी व योग्य प्रकारे वाळवून सुकी वैरण तयार करता येते. हिरवा चारा सुकवून त्यातील पोषक द्रव्ये, खनिजे व जीवनसत्वे टिकविता येतात. उत्तम प्रतीची सुकी वैरण बनविण्याचे यश हे चारा कापण्याची वेळ, त्याची वाढ, ऋतुमान व चारा वाळविण्याची इत्यादी गोष्टीवर अवलंबून असते. चारा फुलोऱ्यात असताना कापल्यास त्यातील पोषक द्रवे जास्तीत जास्त प्रमाणात टिकतात. गवतास बुरशी नसावी, खराब वास नसावा. सर्वसाधारणपणे चाऱ्यामध्ये ६५.८५ टक्के पाण्याचे प्रमाण असते. परंतु सुकी वैरण बनविताना चाऱ्यामध्ये पाण्याचे प्रमाण १५ टक्के असावे.

द्विदल चाऱ्याची सुकी वैरण : या प्रकारच्या वैरणीमध्ये प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्वे जास्त असतात. हा चारा खाण्यास रुचकर असतो. द्विदल सुकी वैरण बनविण्यासाठी लुसर्न, बरसीम, गवार, चवळी इत्यादी पिकांचा वापर करतात.

इतर चाऱ्यापासून सुकी वैरण : या वैरणीमध्ये द्विदल सुक्या वैरणीच्या तुलनेत प्रथिने, खनिजे व कॅरोटीनचे प्रमाण कमी असते. हा चारा कमी रुचकर असतो. कुरणातील वाळलेले गवत, बाजरी, ज्वारी इत्यादी पिकांचा समावेश होतो. मक्यापासून प्रथिने, खनिजे, जीवनसत्वे द्विदल चाऱ्याइतकीच मिळतात.



मुरघास निर्मिती : हिरव्या चाऱ्यातील सर्व पोषण मूल्ये आहे त्याच प्रमाणात टिकविली जातात. मुरघास बनविण्यासाठी योग्य चारा, योग्य कापणीची वेळ असावी. चारा लवकरात लवकर फुलोऱ्यात येणारा असावा. पिष्टमय पदार्थ अधिक असावेत. मुरघास बनविण्यासाठी मका पिकाचा वापर करत असताना झाडाची खालची एक, दोन पाने वळायला लागतात. कणसामध्ये चीक तयार होतो तेव्हा कापणी करावी. बरसीम, लुसर्न ही चारा पिके फुलावर आल्यावर कापणी करावी.

मुरघासासाठी खड्डा : खड्यांची रचना, त्यांचा आकार आणि बांधणीची रचना ही त्या ठिकाणची स्थानिक परिस्थिती, जमिनीतील पाण्याची पातळी आणि जनावरांची संख्या यावर अवलंबून असते. खड्याच्या भिंती गुळगुळीत असाव्यात. भिंतींना भेगा नसाव्यात. खड्याची खोली ही त्या भागातील जमिनीतील पाण्याच्या पातळीवर अवलंबून असते. जेथे पाण्याची पातळीवर असते तेथे जमिनीवर मनोरे बांधावेत. साधारणत: १ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १ मीटर खोल इतक्या आकाराच्या खड्यात १ टन चारा साठवता येतो. कडबाकुट्टी यंत्राच्या साह्याने चाऱ्याचे बारीक १.५ ते २.५ सेंमी एवढे तुकडे करावेत. मुरघासाचा खड्डा साफ करून घ्यावा. तळाशी आणि बाजूंच्या भिंती यावर पसरले जाईल असे काळ्या रंगाचे प्लास्टिक पसरावे. खड्यांच्या आकारमानापेक्षा हे प्लास्टिक मोठे असावे कारण मुरघास खड्यात चारा भरताना जमिनीच्या वर १ ते १.५ मीटर पर्यंत भरावा लागतो. त्यानंतर त्यावर बाहेर सोडलेले प्लास्टिक अवरणासारखे पसरावे लागते. कुट्टी केलेला चारा खड्यात दाबून भरून घ्यावा. त्यामुळे त्यातील हवा बाहेर निघून जाईल. चाऱ्याचा थर जमिनीच्यावर १ ते १.५ फूट आल्यावर त्यावर वाळलेले गवत, ऊस पाचट, गव्हाचे काड किंवा पॉलिथिन टाकावे. त्यावर शेण मातीचा थर द्यावा.

## पावसाळ्यात कुक्कुटपालनाचे व्यवस्थापन

पावसाळा सुरू होताच कुक्कुटपालकांसमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहतात. वाढलेली आर्द्रता, शेडमध्ये होणारी ओलसरता, खाद्य खराब होणे आणि विविध रोगांचा प्रादुर्भाव यामुळे कोंबड्यांच्या आरोग्यावर तसेच अंडी आणि मांस उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पावसाळ्यात योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य काळजी घेतल्यास उत्पादन टिकवून ठेवता येते आणि आर्थिक नुकसानही टाळता येते.

शेड कोरडे आणि स्वच्छ ठेवणे : पावसाळ्यात सर्वप्रथम कुक्कुट शेडमध्ये पावसाचे पाणी शिरणार नाही याची काळजी घ्यावी. शेडच्या छताची गळती त्वरित दुरुस्त करावी तसेच बाजूंना पडदे किंवा योग्य संरक्षणाची व्यवस्था करावी. शेडमधील गादी ओलसर झाल्यास ती त्वरित बदलावी किंवा कोरडी करावी. ओल्या गादीमुळे अमोनियाचे प्रमाण वाढते आणि पक्ष्यांच्या पायांना तसेच श्वसनसंस्थेला त्रास होऊ शकतो.

योग्य हवा खेळती : पावसाळ्यात अनेक शेतकरी थंडीपासून बचाव करण्यासाठी शेड पूर्णपणे बंद करतात. मात्र त्यामुळे शेडमध्ये दमटपणा वाढून रोगांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे पावसाचे पाणी आत येणार नाही याची काळजी घेत पुरेशी हवा खेळती राहील अशी व्यवस्था करावी. योग्य वायुवीजनामुळे पक्षी निरोगी राहतात आणि



उत्पादनावरही सकारात्मक परिणाम होतो.

खाद्य आणि पाण्याची विशेष काळजी : पावसाळ्यात खाद्य ओलसर होऊन त्यामध्ये बुरशी निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे खाद्य नेहमी कोरड्या आणि हवेशीर ठिकाणी साठवावे. बुरशी लागलेले किंवा गुठळ्या झालेले खाद्य कोंबड्यांना देऊ नये. तसेच स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी सतत उपलब्ध ठेवावे. खाद्य आणि पाण्याची भांडी दररोज स्वच्छ धुणेही तितकेच आवश्यक आहे.

रोगांपासून संरक्षण : पावसाळ्यात कुक्कुटपालनात श्वसनाचे आजार, बुरशीजन्य संसर्ग, कॉक्सिडिओसिस आणि इतर रोगांचा धोका वाढतो. त्यामुळे नियमित निर्जंतुकीकरण करावे, आजारी पक्षी त्वरित वेगळे ठेवावेत आणि लसीकरणाचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळावे. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्याने आवश्यक पूरक आहार आणि औषधांचा वापर करावा.

माशा आणि कीटकांवर नियंत्रण : ओलसर वातावरणामुळे माशा आणि इतर कीटकांची संख्या झपाट्याने वाढते. त्यामुळे शेडची नियमित साफसफाई करावी आणि आवश्यकतेनुसार कीटक नियंत्रणाची उपाययोजना करावी. यामुळे रोगांचा प्रसार कमी होण्यास मदत होते.

बैठक व्यवस्थेकडे दुर्लक्ष नको : गादी पद्धतीने संगोपन करत असल्यास कोंबड्यांसाठी उंचावरील बैठक व्यवस्था करावी. त्यामुळे पक्षी ओल्या जमिनीच्या संपर्कात येत नाहीत आणि पायांचे आजार किंवा संसर्ग होण्याचा धोका कमी होतो. तसेच शेडमध्ये पक्ष्यांची अतिगर्दी टाळावी.

उत्पादन टिकवण्यासाठी महत्त्वाचे उपाय : नियमित निरीक्षण, स्वच्छता, कोरडे वातावरण, संतुलित खाद्य, शुद्ध पाणी आणि वेळेवर लसीकरण या गोष्टींचे पालन केल्यास पावसाळ्यातही कुक्कुटपालन फायदेशीर राहू शकते. हवामानातील बदल लक्षात घेऊन व्यवस्थापनात वेळोवेळी सुधारणा करणे गरजेचे आहे. पावसाळ्यातील वाढलेली आर्द्रता आणि सततचा पाऊस कुक्कुटपालनासाठी आव्हानात्मक असला तरी योग्य शेड व्यवस्थापन, स्वच्छता, खाद्य-पाणी व्यवस्थापन आणि रोगप्रतिबंधक उपाययोजना यामुळे नुकसान मोठ्या प्रमाणात टाळता येते. शेतकऱ्यांनी वेळेवर काळजी घेतल्यास कोंबड्यांचे आरोग्य चांगले राहते, मृत्यूदर कमी होतो आणि अंडी तसेच मांस उत्पादनात सातत्य राखता येते.




### महत्वाच्या घटना

१५८३ : अमेरिका सर हम्फ्रे गिल्बर्ट यांनी उत्तर अमेरिकेत पहिली इंग्रजी वसाहत स्थापन केली
१८६१ : अमेरिकन सैन्यातील चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यात आली.
१९१४ : ओहायो मध्ये पहिले इलेक्ट्रिक ट्रॅफिक सिगनल बसवले.
१९६२ : कन्या नक्षत्रात पहिल्या 'क्वासार' तार्याचं अस्तित्त्व सिद्ध करण्यात यश
१९६२ : नेल्सन मंडेला यांना तुरुंगात टाकण्यात आले. यानंतर १९९० मधे त्यांची सुटका झाली.
१९६३ : शीतयुद्ध आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.
१९६५: पाकिस्तानी सैन्याने साध्या वेषात घुसखोरी केल्यामुळे भारत पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.
१९७३ : मार्स ६ अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.
१९९४ : इंडियन नॅशनल सायन्स अ‍ॅकेडमी तर्फे दिला जाणारा 'होमी जहांगीर भाभा पुरस्कार' राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेले संचालक प्रा. इरोड सुब्रमणियन राजगोपाल यांना प्रदान
१९९७ : फ्रेन्च खुल्या लॉनटेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरी गटात विजेतेपद मिळवणार्या महेश भूपतीला क्रीडा खात्यातर्फे २ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर
१९९७ : रशियाच्या दोन अंतराळवीरांना घेऊन 'सोयूझ-यू' हे अंतराळयान 'मीर' अंतराळस्थानकाकडे रवाना
२०१६ : ब्राझिलमधे रिओ-डी-जानिरो येथे ३१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात होणार आहे.
२०१९ : भारत जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.
२०२० : राम मंदिर, अयोध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५० : फ्रेंच लघुकथाकार व लेखक गाय दी मोपासां यांचा जन्मदिन.
१८५२ : ब्रिटीश कालीन भारतातील उडीसा राज्यातील राष्ट्रवादी स्वातंत्रता सेनानी आचार्य प्यारे मोहन यांचा जन्मदिन.
१८५८ : वासुदेव वामन तथा 'वासुदेवशास्त्री' खरे इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी (मृत्यू: ११ जून १९२४)
१८९० : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (मृत्यू: ६ आक्टोबर १९७९)
१९०१ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१५ : पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार, सन्मानित प्रख्यात हिंदी कवी व शिक्षणतज्ञ शिवमंगल सिंग 'सुमन' यांचा जन्मदिन.
१९३० : नील आर्मस्ट्राँग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (मृत्यू: २५ ऑगस्ट २०१२)
१९३३ : विजया राजाध्यक्ष लेखिका व समीक्षिका, ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा
१९४७ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी वीरेन डंगवाल यांचा जन्मदिन.
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी महेंद्र कर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९६९ : वेंकटेश प्रसाद जलदगती गोलंदाज
१९७२ : अकिब जावेद पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९७५ : काजोल अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८८२ : लुई (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म:८६३)
१८९५ : जर्मन तत्त्ववेत्ता, इतिहासकार, साम्यवादी, सामाजिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि व्यवसायिक फ्रेडरिक एंगेल्स यांचे निधन.
१९५० : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वतंत्रता सेनानी व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचे निधन.
१९६२ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांनी गोळी झाडुन घेऊन आत्महत्या केली. (जन्म: १ जून १९२६)
१९८४ : रिचर्ड बर्टन अभिनेता (जन्म: १० नोव्हेंबर १९२५)
१९९१ : होंडा कंपनी चे स्थापक सुइचिरो होंडा यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर १९०६)
१९९२ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (जन्म: ५ फेब्रुवारी १९०५)
१९९७ : के. पी. आर. गोपालन स्वातंत्र्यसैनिक, कम्युनिस्ट व नक्षलवादी नेते (जन्म: )
२००० : लाला अमरनाथ भारद्वाज भारतीय क्रिकेटचे भीष्माचार्य, स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार व स्वतंत्र भारताचे पहिले शतकवीर
२००१ : ज्योत्स्ना भोळे संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६), विष्णूदास भावे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, महाराष्ट्र विशेष गौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: ११ मे १९१४)
२०१४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार चापमॅन पिंचर यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९१४)



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
गुरूवार दि.६ ऑगस्ट २०२६ ५



# सोलार कंपनीने तननाशक फवारल्याने पन्नास एकरवरील पिकांचे नुकसान

## साठ लाखांचे नुकसान, शेतकऱ्यांचा टाहो







बीड। प्रतिनिधी

तालुक्यातील कुक्कडगाव येथील सोलार कंपनीने आपल्या क्षेत्रात विघातक असे तननाशक फवारले. या तननाशकाचा प्रादूर्भाव परीसरातील पन्नास एकर क्षेत्रावरील कापूस, तूर व पपई पिकांवर होऊन सर्व पीक जळाले आहे. शेतकऱ्यांचे साठ लाख रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाल्याने शेतकऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कुक्कडगाव शिवारातील गट क्र. १७२,१६७,१६६,१६५,१६९,१७० मध्ये गोरखनाथ शिंदे, भारत शिंदे, अण्णासाहेब शिंदे, रामचंद्र शिंदे, दत्तात्रय चौरे, चंद्रकांत नवले आदी वीसपेक्षा अधिक शेतकर्यांची जमीन आहे.

बुधवारी सकाळी या प्रादुर्भाव झालेल्या पिकांची पाहणी राजाभाऊ महाराज कुटे, लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, संतोष भारती, राहुल लोंढे,शेतकरी समितीचे राजेंद्र आमटे यांनी पाहणी करुन शेतकर्यांना न्यायाची मागणी केली.शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कापूस, तूर, पपई हे पीक घेतलेले आहे. याच शिवारात गट क्र. १७३ व १७४ मध्ये करवा सोलार एनर्जी चा प्लँट आहे. या प्लँटमध्ये कंपनीच्या क्षेत्रात विघातक असे तननाशक फवारण्यात आले होते. या फवारणीचा परीणाम परीसरातील पन्नास एकर क्षेत्रावरील कापूस, तूर व पपई पिकांवर होऊन साठ लाखांपेक्षा अधिक रुपयांचे नुकसान झाले आहे. या संदर्भात शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी व तहसीलदार बीड यांना निवेदन देऊन न्यायाची मागणी केली आहे. या सर्व क्षेत्रातील पिकांचे कृषी विभागाच्या तालुका तक्रार निवारण समीती व कृषी विगातील तज्ज्ञ अधिकार्यांनी पाहणी करून पंचनामा केला आहे. यात पन्नास टक्के नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. या शेतकऱ्यांनी पोलीस निरीक्षक पिंपळनेर यांनाही निवेदन दिले आहे. यानंतरही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायाची मागणी केली आहे.

### शेतकऱ्यांना भरपाई द्यावी

कुक्कडगाव येथील ज्येष्ठ शेतकरी राजाभाऊ महाराज कुटे म्हणाले, की शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पीक करपले असून वाढ खुंटली आहे. शासनाने सदरील कंपनीवर गुन्हा दाखल करुन शेतकर्यांना नुकसान भरपाई द्यावी.

# जलसंधारणाची कामे प्राधान्याने मंजूर करा

## बोराडे यांची मृद व जलसंधारण मंत्री यांच्याकडे मागणी



मंठा। प्रतिनिधी

परतुर विधानसभा मतदारसंघातील परतुर व मंठा या दोन्ही तालुक्यांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घेण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे यांनी केली आहे. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड हे घनसावंगी तालुक्याच्या दौऱ्यावर असताना श्री. बोराडे यांनी त्यांची भेट घेऊन यासंदर्भात निवेदन दिले. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर हे होते.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे म्हणाले की, परतुर आणि मंठा तालुक्यातील शेती पाण्यावर अवलंबून आहे. पावसाळ्यात पाणी साठवण आणि उन्हाळ्यात पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारणाची कामे आवश्यक आहेत.मंठा व परतूर तालुक्यात नवीन सिमेंट नाला बंधारे बांधणे,पाझर तलाव दुरुस्ती करणे, पाझर तलावातील गाळ काढणे, नाला खोलीकरण व रुंदीकरण करणे या सर्व योजनांना तातडीने मंजुरी मिळाल्यास दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल आणि भूजल पातळी वाढण्यास मदत होईल, असेही त्यांनी ना. संजय राठोड यांना सांगितले.रयावेळी ना. राठोड यांनी जिल्हाप्रमुखांच्या मागणीची दखल घेत लवकरच यावर सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले.

# उपजिल्हा रुग्णालय परिसरातील नागरिक दुर्गंधीने हैराण

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी शहरातील उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी वसाहतीतील गटार व सेप्टिक टँक तुंबल्याने संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे आमदार कार्यालय व परिसरातील रहिवाशांना त्रास होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे विकास आराखड्यातील या वसाहती मधून जाणारा वीस फुटी रस्ता तातडीने सुरू करावा यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी पालिकेला आदेश देण्याची आवश्यकता आहे उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी वसाहती मधील बहुतेक कर्मचारी निवासस्थाने बंद अवस्थेत आहेत तुरळक निवस्थानांमध्ये कर्मचारी राहतात त्यांनाही दुर्गंधीचा प्रचंड त्रास होतो गेल्या अनेक वर्षांमध्ये अशा पद्धतीची कामे झालेली नाहीत या इमारतीच्या भिंतीला लागून आमदार मोनिका राजळे यांचे संपर्क कार्यालय असून परिसरापासून हाकेच्या अंतरावर नगराध्यक्षांचे निवासस्थान आहे.

शहरातील सर्वाधिक उच्चभ्रू वस्ती म्हणून साईनाथ नगर कडे बघितले जाते उपजिल्हा रुग्णालयाकडे परिसरातील रहिवाशांनी वेळोवेळी तक्रारी केल्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती असते गेले अनेक वर्षांपासून या परिसराची देखभाल व दुरुस्ती झालेली नाही त्यामुळे सर्वत्र काटेरी झुडपांचे गवत इतर केर कचरा साचला आहे काही दिवसांपूर्वी वसाहतीतील रिकाम्या बंगल्याच्या आवारा मध्ये चालणाऱ्या नशीखोरांच्या पार्ट्या परिसरातील रहिवाशांनी बंद पाडल्या या इमारतीच्या मागील बाजूकडील कंपाऊंड पासून वीस फुटी रस्ता प्रस्तावित आहे बाजार तळावरील खंडोबा मंदिरापासून एडके कॉलनी कडे जाणारा हा रस्ता पूर्ण झाल्यास संपूर्ण वसाहतीतील विविध समस्या कमी होण्यास मदत होईल राजकीय हस्तक्षेपामुळे हा रस्ता होऊ दिला जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे सध्या येथील दुर्गंधीची समस्या तीव्रतेने भेडसावत असून भिंती लगतच्या रहिवाशांना दार खिडक्या सतत बंद ठेवून घरात वावरावे लागते आमदार मोनिका राजळे यांच्या कार्यालयात दिवसभर कार्यकर्ते व गरजूंची वर्दळ असते येथे येणाऱ्या लोकांना आवारामधील कंपाऊंडच्या बाजू कडील बाजूने दुर्गंधीचा सामना करावा लागतो अर्बन बँक इमारतीपासून आमदारांच्या कार्यालयापर्यंतचा हा भाग या समस्येने त्रस्त आहे गेले अनेक दिवस आवारात ची देखभाल व दुरुस्ती न झाल्याने संरक्षक भिंत सुद्धा धोकादायक बनली आहे सापांची समस्या सध्याच्या वातावरणात त्रासदायक ठरत असून सर्वच रहिवासी त्रस्त झाले आहेत सार्वजनिक बांधकाम विभागाने सेफ्टीक टँक दुरुस्ती व गटारांची स्वच्छता करण्याची लोकांची मागणी आहे उपजिल्हा रुग्णालयाकडे या कामासाठी आर्थिक तरतूद नसून सर्वच शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत असल्याने येथील समस्येकडे सुद्धा गांभीर्याने बघून नागरिकांच्या आरोग्याबाबत योग्य त्या उपाययोजना व्हायला तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

# माजी मंत्री स्व.अनिल राठोड यांच्या स्मरणार्थ रुग्णांना फळ वाटप



पाथर्डी । प्रतिनिधी

आहिल्यानगर विधानसभा मतदारसंघाची सलग पाच वेळा आमदार राहिलेले शिवसेनेचे उपनेते व पहिल्या शिवशाही सरकारमध्ये मंत्री असलेले तसेच संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असणारे व हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या अत्यंत विश्वासू आणि निकटवर्ती असलेले माजी मंत्री स्वर्गीय अनिल भैय्या राठोड यांच्या पुण्यस्मरणार्थ उपजिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांना फळांचे वाटप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आले यावेळी भैया यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना मानाचा जय महाराष्ट्र करण्यात आला अनिल भैया राठोड यांची असणारी कार्यकर्त्याप्रति प्रेम व समदृष्टी ठेवून केलेले राजकारण त्याच बरोबर शिवसेनेसाठी त्यांचे असणारे योगदान या सर्व गोष्टीचा इतिहास वाकन्यासारखा आहे भैय्यांच्या आठवणीने शिवसैनिकाबरोबर समविचारी पक्षाचे कार्यकर्ते ही गहिवरले गेले यावेळी उपजिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षक डॉक्टर मनीषा खेडकर शिवसेना नेते विष्णुपंत पवार शिवसेना तालुकाप्रमुख नवनाथराव चव्हाण शिक्षक सेने तालुकाप्रमुख नंदकुमार डाळिंबकर नवनाथराव वाघ युवा सेना शहर प्रमुख सचिन नागापुरे शहर संघटक संतोष मेघुंडे कॉंग्रेस तालुकाध्यक्ष नासिर शेख सामाजिक कार्यकर्ते सुनील पाखरे बाळासाहेब कांबळे युवा सेनेचे राहुल पालवे मंगेश राठोड धनंजय शेळके तसेच शिवसैनिक अनिल भैय्यांवर प्रेम करणारे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

### मा. श्री. रफीक ए. शेख, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक:- १२४६/२०२६**
**( मार्फत विधिज्ञ:- ॲड जी बी कुलकर्णी)**

अर्जदार :- १. अमित पि. पद्माकरराव हसेगावकर, वय ४६ वर्षे, धंदा वकिली, रा. सुभग, विदयानगर (पश्चिम), बार्शी रोड, बीड, ता.जि.बीड, २. मेघा भ्र. अविनाश कांबळे, वय - ४८ वर्षे, धंदा नौकरी, रा. प्लॉट नंबर २. सियाराम कॉलनी, चुनाभट्टी कोलार रोड, भोपाळ (मध्यप्रदेश),

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे पद्माकरराव भगवानराव हासेगावकर हे दिनांक १०/०२/२०२६ रोजी मेडीकेअर हॉस्पीटल, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क. १ हा मयताचा मुलगा आहे. तर अर्जदार क. २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०४/०८/२०२६ रोजी
न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीखः ०२/०९/२०२६.

आदेशावरुन
स्वाक्षरीत/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११२१**
**दिनांक - ०५/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती शंकर दत्तात्रय गायकवाड रा. भनगजळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | शितर शंकर गायकवाड | मुलगी | २५/०७/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११११**
**दिनांक - ०५/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती सय्यद परवीन बेगम चुन्नुमिया रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सय्यद परवीन बेगम चुन्नुमिया | स्वतः | १५/०७/१९७९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# धर्म, शील आणि संयमाचे रक्षण करणाऱ्यालाच खरा विजय लाभतो -महासती निर्मलाजी





जालना। प्रतिनिधी

संकटाच्या काळात धर्म, शील आणि संयमाचा त्याग न करता विवेकाने मार्गक्रमण करणाऱ्यालाच जीवनात खरा विजय प्राप्त होतो, असे प्रतिपादन तपकौमुदी उपप्रवर्तिनी महासती निर्मलाजी म.सा. यांनी धर्मसभेत केले. धर्म हा केवळ पूजा-अर्चा किंवा धार्मिक विधींमध्ये मर्यादित नसून तो प्रत्येकाच्या विचार, आचरण आणि निर्णयांमध्ये प्रतिबिंबित झाला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. प्रवचनात त्यांनी स्पष्ट केले की, लोभ, मोह, अहंकार आणि स्वार्थ या दुर्गुणांमुळे मनुष्य विवेक गमावतो आणि चुकीच्या निर्णयांकडे प्रवृत्त होतो. क्षणिक सुखाच्या मोहात घेतलेले निर्णय अनेकदा आयुष्यभर दुःख आणि पश्चात्तापाचे कारण ठरतात. त्यामुळे प्रत्येकाने आत्मसंयम, करुणा आणि सद्सद्विवेकबुद्धी जोपासून धर्ममूल्यांनुसार जीवन जगावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी त्यांनी एका धर्मनिष्ठ महाराणीचा प्रेरणादायी प्रसंग सांगितला. सतीत्व आणि धर्मरक्षणावर संकट ओढवले असताना महाराणीने भीती न बाळगता धैर्य, संयम आणि बुद्धिमत्तेच्या बळावर परिस्थितीचा सामना केला. धर्माशी कोणतीही तडजोड न करता विवेकपूर्ण निर्णय घेतल्यामुळे संकटाचे रूपांतर विजयात झाले. अढळ श्रद्धा, दृढनिश्चय आणि शुद्ध आचरण असलेल्या व्यक्तीला परमात्म्याची कृपा निश्चितच लाभते, असा संदेश त्यांनी या प्रसंगातून दिला. महासती निर्मलाजी म.सा. म्हणाल्या की, वासना आणि अहंकाराच्या आहारी गेलेला मनुष्य मदमस्त हत्तीप्रमाणे स्वतःच्याच विनाशाला कारणीभूत ठरतो. म्हणून मन, वचन आणि काया यांवर संयम ठेवणे हीच खरी साधना आहे. बाह्य शत्रूंवर विजय मिळवण्यापेक्षा स्वतःच्या विकारांवर विजय मिळवणे अधिक महत्त्वाचे असून त्यातूनच आत्मशांती आणि आत्मोन्नतीचा मार्ग खुला होतो. त्या पुढे म्हणाल्या की, क्षमा ही दुर्बलतेचे नव्हे तर अंतःकरणाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. अन्याय करणाऱ्याविषयीही द्वेष न बाळगता समता, करुणा आणि सद्भावनेचा स्वीकार करणारा व्यक्तीच धर्माचे खरे पालन करतो. समाजात शांतता, बंधुभाव आणि सौहार्द टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येकाने या मूल्यांचे जतन करणे आवश्यक आहे. प्रवचनाच्या शेवटी त्यांनी उपस्थितांना सत्य, अहिंसा, संयम, सदाचार आणि गुरूंच्या शिकवणीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. शरीर, संपत्ती, मान-सन्मान आणि वैभव हे क्षणभंगुर असले तरी धर्माने कमावलेले संस्कार, सद्गुण आणि शुभकर्म हेच जीवाचे खरे वैभव असून त्यातूनच आत्मकल्याण आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग प्रशस्त होतो, असे त्यांनी सांगितले.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११००**
**दिनांक - ०४/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती सलीम लियाकत तांबोळी रा. वडीगोदरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या बहिण जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सायमा सलिम तांबोळी | बहिण | ०७/०७/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-२९२**
**दिनांक - ०९/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती गफुर कादर शेख रा. लालवाडी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | गफुर कादर शेख | स्वतः | ०१/०१/१९५८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११२२**
**दिनांक - ०५/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती प्रकाश राम खांडेकर रा. धनगरपिंप्री ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | मयुरी प्रकाश खांडेकर | मुलगी | ३०/०१/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर रेकॉर्ड करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श समोर ठेवावा - माजी आ. भीमराव धोंडे

## क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन, धोंडे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

**खेळामध्ये यश मिळवायचे असेल तर जागतिक पातळीवर रेकॉर्ड करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श समोर ठेवावा असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी कडा येथे केले.**

माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल शिक्षण संस्था व इतर संस्थांच्या शालेय विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी

व्यासपीठावर सौ. दमयंतीताई धोंडे, महेश कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे, सौ. पायलताई धोंडे, सौ. सविताताई धोंडे,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष काकासाहेब शिंदे, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप,चेअरमन राजेश धोंडे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे,कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती नामदेव धोंडे,रामराव खेडकर,

राजाबापु नलावडे, नानाभाऊ वाडेकर, हरिभाऊ जंजिरे, महेश कारखान्याचे संचालक बजरंग कर्डिले, अंकुश मुंढे, पांडुरंग गावडे व इतरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागात गुणवंत खेळाडू निर्माण होतील. खेळात विविध पातळीवर यश संपादन केल्यास वेगवेगळ्या ठिकाणी शासकीय विभागात नोकरीच्या भरपूर संधी आहेत. खेळात यश



मिळवण्यासाठी जागतिक पातळीवर रेकॉर्ड करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श विद्यार्थ्यांनी समोर ठेवावा. खेळात विविध पातळीवर खेळल्याने मिळालेल्या प्रमाणपत्रामुळे शासकीय विभागात वेगवेगळ्या पदावर चांगली नोकरी मिळू शकते. आपल्याला भविष्यात कोणत्या क्षेत्रात करिअर करायची आहे हे विद्यार्थ्यांनी आतापासूनच ठरवावे आणि त्या दृष्टीने तयारी करावी. यश मिळवायचे असेल तर वारंवार होणाऱ्या क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हावे. तसेच पालकांनी आपल्या मुला-मुलींना सकस आणि चांगला आहार द्यावा.

क्रीडा महोत्सवात आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील वेगवेगळ्या संस्थेतील हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते प्रारंभी कडा शहरातून क्रीडा ज्योतीची भव्य अशी रॅली काढण्यात आली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते यांनी सांगितले की, संस्था अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबिर, क्रीडा महोत्सव तसेच इतर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी या स्पर्धाचे आयोजन केले आहे. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदराव धोंडे महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी महेश कारखान्याचे संचालक विधाते,बाबा वाघुले, सरपंच सावता ससाने, विठ्ठल लांडगे, मधुकर शिरोळे, राजू रासकर, बाळासाहेब भुकन, सुदाम झिंजुर्के,बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब पवार, नानाभाऊ वाडेकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले,लिंबराज कर्डिले, सोनाजी गांजुरे, सरपंच माऊली वाघ, रामकिशन बुचुडे, बाबा ससाने, सरपंच सोमनाथ गायकवाड, प्रा. डॉ. बाळासाहेब धोंडे, माजी सभापती अनिल जायभाय, चेअरमन डॉ. शाम सांगळे, चेअरमन दादासाहेब हजारे, सेवानिवृत्त पीएसआय शेख व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य बापू खैरे, प्रा. विनोद ढोबळे यांनी केले. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी कार्यकर्ते व शिक्षकांनी त्यांना भरभरून अशा शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे दोन दिवसांपूर्वी कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात घेण्यात आलेल्या धोंडे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धांचे बक्षीस वितरण याप्रसंगी करण्यात आले.

# माजलगावातील अतिक्रमण कारवाईपूर्वी पुनर्वसनाची मागणी
## शेख ईद्रीस पाशा, शेख युसुफ यांचे एकदिवसीय धरणे आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात आज दि ०६ ऑगस्ट गुरुवार रोजी पासुन अतिक्रमण हटविण्याची कारवाई होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.त्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन माजलगावच्या वतीने संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शेख युनूस व तालुकाध्यक्ष शेख इदरीस पाशा यांनी दि.०५ ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी १०:०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे एकदिवसीय धरणे आंदोलन सुरू केले आहे.



शहरातील अतिक्रमण हटवण्याची कारवाई आज दि ०६ ऑगस्ट गुरुवार रोजी सुरू करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने एमआयएम पार्टीने पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख युसूफ व तालुका अध्यक्ष शेख इदरीस पाशा यांनी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे एकदिवसीय धरणे आंदोलन सुरू केले आहे. यावेळी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात असे म्हटले म्हटले आहे की,अतिक्रमण हटविण्यापूर्वी संबंधित विभागामार्फत अधिकृत मोजमाप करून सीमांकन (मार्किंग) करण्यात यावे. केवळ छत्रपती संभाजी महाराज चौक,मौलाना आझाद चौक ते बायपास रोड या परिसरा पुरतीच कारवाई न करता संपूर्ण माजलगाव शहरातील प्रमुख रस्त्यांचे सर्वेक्षण करून सर्वांवर समान निकषांनुसार अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबवावी. आठवडी बाजार जुना तहसील रोड व राष्ट्रीय महामार्ग परिसरात भरत असल्याने वाहतुकीची मोठी कोंडी थांबवावी. बाजारासाठी प्रशासनाने ◀◀ पान ३ वर

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरील टीकेचे परळीत पडसाद
## राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी सपकाळांच्या फोटोला मारले जोडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या विषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला परळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जोडे मारून काँग्रेस पक्षाचा जाहीर निषेध आंदोलन करून करण्यात आले.

सुनेत्रा पवार यांच्या विषयी काँग्रेसच्या सोशल मीडिया





हँडलवरून करण्यात आलेल्या वक्तव्यामुळे राज्यात सर्वत्र काँग्रेसची नाचक्की होत असून, हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या टीमला समज देण्याऐवजी टीकेचे समर्थन केले तसेच धनंजय मुंडे यांच्या बाबतीतही बेताल वक्तव्य केल्याने परळी वैद्यनाथ तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले होते. त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेस जोडे मारत काँग्रेसच्या या कृत्याचा निषेध नोंदवला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष तथा नगरपरिषदेचे गटनेते वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष आयुबभाई पठाण, सरचिटणीस आनंत इंगळे, ◀◀ पान ३ वर

# चेक बाऊन्स प्रकरणात आरोपीस ६ महिन्यांचा सश्रम कारावास;
## ९.९६ लाखांची भरपाई देण्याचे बीड न्यायालयाचे आदेश!

**ॲड.तेजस नेहरकर यांच्या प्रभावी युक्तिवादाने बीडमधील सोन्याच्या व्यापाऱ्यास मिळाला न्याय**

बीड । प्रतिनिधी

धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात बीड येथील न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि धडक निकाल दिला आहे. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्ट, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत दाखल (एस.सी.सी. क्र. १४८७/२०१८) प्रकरणात फिर्यादी सोन्याच्या व्यापाऱ्याची तक्रार योग्य ठरवत, न्यायालयाने आरोपी सुरेश हर्ष बडे (रा. बीड) यास दोषी ठरवून ६ महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.



फिर्यादींचा बीड शहरात सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा व्यवसाय आहे. आरोपी सुरेश बडे याने व्यावसायिक व्यवहारातून ५,६१,२००/- किंमतीचे सोन्याचे दागिने उधारीवर खरेदी केले होते. या देय रकमेच्या परतफेडीसाठी आरोपीने एक धनादेश (उहर्शािंश) दिला होता. मात्र, सदर धनादेश बँकेत वटवण्यासाठी सादर केला असता Funds Insufficient (खात्यात अपुरी रक्कम) या कारणास्तव तो अनादरित झाला.

या प्रकारानंतर फिर्यादीने कायदेशीर नोटीस बजावूनही आरोपीने थकीत रक्कम अदा केली नाही. त्यामुळे अखेर व्यापाऱ्याने न्यायालयाचे दरवाजे ठोठावत तक्रार दाखल केली. न्यायालयात फिर्यादीच्या वतीने ड. तेजस सुभाष नेहरकर यांनी बाजू मांडली. त्यांनी: मूळ धनादेश, बँकेचा परतावा मेमो कायदेशीर नोटीस आणि पोस्टल ट्रॅक रिपोर्ट इतर सर्व दस्तऐवजी पुरावे अतिशय अचूक व कायदेशीरदृष्ट्या भक्कमपणे न्यायालयासमोर सादर केले. बचाव ◀◀ पान ३ वर

# कांगणेवाडीतील माधवबाबा मंदिर व विठ्ठल रुक्मिणी मंदिरात चोरी

बर्दापूर प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर पोलिस स्टेशन हद्दीतील उजनी बिट कांगणेवाडी येथील प्रसिद्ध माधवबाबा मंदिर व विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने देवाच्या मूर्तीवरील सोन्या-चांदीचे दागिने आणि दानपेटीतील रोख रक्कम असा एकूण १ लाख ७५ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दिनांक २ ऑगस्ट रोजी पहाटे घडल्याचे उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसर आणि भाविकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

कांगणेवाडी येथील अंगद देवराव कांगणे हे गेल्या चार वर्षांपासून गावातील माधवबाबा मंदिराचे व विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे पुजारी म्हणून काम पाहतात. नित्यनियमाप्रमाणे पूजा आटोपल्यानंतर सायंकाळी मंदिरात सर्व दागिने व दानपेटी सुरक्षित होती. मात्र, दुसऱ्या दिवशी पहाटे ग्रामस्थ दर्शनासाठी गेले असता मंदिराचे कुलूप तोडलेले आणि दानपेटी फुटलेली दिसून आली.

पुजाऱ्यांनी मंदिरात जाऊन पाहणी केली असता विठ्ठल रुक्मिणी मूर्तीवरील ५८ हजार ८०० रुपयांचा ◀◀ पान ३ वर

# स्व. अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यातील पहिल्या पुतळा उभारणीच्या कामाला वेग

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यातील पहिल्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी परळी शहरात करण्यात येणार असून, या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला आता वेग आला आहे. पुतळा उभारणीसंदर्भातील विविध, तांत्रिक मान्यता व प्रशासकीय बाबींचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या



बैठकीला संबंधित विभागांचे अधिकारी, परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, तसेच सप्तशृंगी दुर्गा उत्सव सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेली जागा, तांत्रिक बाबी, प्रशासकीय प्रक्रिया आणि इतर आवश्यक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी पुतळा उभारणीसंदर्भातील सर्व बारकावे अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आले. शासन स्तरावर या कामाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून येत्या काही महिन्यांत परळी शहरात स्व. अजितदादा ◀◀ पान ३ वर

# ब्रह्माकुमारीच्या वतीने व्यसनमुक्ती महा अभियान
## शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रामुख्याने होणार प्रबोधन

**ब्रह्माकुमारीजतर्फे १० कोटी व्यसनमुक्ती प्रतिज्ञा महासंकल्प अभियान**

माजलगाव । प्रतिनिधी

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मेडिकल विंगतर्फे दादी प्रकाशमणीजी यांच्या पावन स्मृतिप्रीत्यर्थ १० कोटी व्यसनमुक्ती प्रतिज्ञा महासंकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. दि.६ ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत संपूर्ण देशभर हे विशेष अभियान आयोजित करण्यात येत असून, विकसित, निरोगी आणि व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.



व्यसनामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात, कौटुंबिक तणाव वाढतो, आर्थिक नुकसान होते आणि युवकांचे भविष्य धोक्यात येते. या पार्श्वभूमीवर राजयोग ध्यान ही आत्मनियंत्रण, मानसिक स्थैर्य आणि दृढ इच्छाशक्ती निर्माण करणारी प्रभावी जीवनशैली असल्याचे डॉ. बनारसी शहा, अध्यक्ष, मेडिकल प्रभाग, माऊंट आबू यांनी नमूद केले आहे.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्रातील सेवाकेंद्र एकवटेल असून राज्यातील ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रातून विविध प्रकारच्या संस्था, महाविद्यालये, शाळा , विविध माध्यमांद्वारे व्यापक जनजागृती होणार असल्याची माहिती डॉ. सोमनाथ वडनेरे, राज्य माध्यम समन्वयक, ब्रह्माकुमारीज् मीडिया प्रभाग, माऊंट आबू यांनी दिली.अभियानात प्रत्येक नागरिकाने ऑनलाइन किंवा व्हॉट्सॲपद्वारे व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा करावी तसेच किमान ५० नागरिकांपर्यंत हा संकल्प पोहोचवावा, असे आवाहन करण्यात ◀◀ पान ३ वर

# वाहतूक पोलिसांच्या धडक कारवाईला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात वाहतूक शिस्त प्रस्थापित करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी सुरू केलेल्या अतिक्रमणविरोधी मोहिमेला सर्वसामान्य नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेचे स्वागत करत सामाजिक कार्यकर्त्यांनी आज वाहतूक पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांचा सत्कार करत ही मोहीम कायम सुरू ठेवावी अशी विनंती वजा मागणी केली.

वाहतूक पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि त्यांच्या संपूर्ण टीमने शहरातील प्रमुख चौक, मुख्य रस्ते आणि वाहतुकीस अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविण्यासाठी केलेली कारवाई नागरिकांच्या मते अत्यंत कौतुकास्पद आहे.




## मोहीम कायम सुरू ठेवण्यात यावी, बीडकरांची मागणी

नागरिकांचे म्हणणे आहे की, अनेक वर्षांपासून रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि पादचाऱ्यांना होणारा त्रास वाढला होता. मात्र, या धडक कारवाईमुळे शहरात वाहतुकीची शिस्त निर्माण होत असून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळत आहे.

नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले की, वाहतूक पोलिसांनी सुरू केलेली ही मोहीम कोणत्याही दबावाला बळी न पडता सातत्याने सुरू ठेवली पाहिजे. तसेच, या मोहिमेत नगर परिषद प्रशासनानेही कठोर भूमिका घेत कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, जेणेकरून हटविण्यात आलेली अतिक्रमणे पुन्हा उभी राहणार नाहीत, अशीही नागरिकांची अपेक्षा आहे.

शहराच्या विकासासाठी, सुरक्षित वाहतुकीसाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी ही कारवाई अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. येणाऱ्या काळात या मोहिमेचा अधिक सकारात्मक परिणाम शहराच्या वाहतूक व्यवस्थेवर आणि बीडकरांच्या दैनंदिन जीवनावर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ◀◀ पान ३ वर

# गेवराईत १४ ऑगस्टला तिरंगा रॅलीचे आयोजन
## प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकवा -बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

१५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टीच्या वतीने गेवराईत दिनांक १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. याचवेळी हर घर तिरंगा हे अभियानही राबविण्यात येत असल्याने प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर भारतीय तिरंगा ध्वज फडकवावा असे आवाहन भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने १५ ऑगस्ट या स्वातंत्र्य



दिनाचे औचित्य साधून दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान तिरंगा रॅली अभियान आयोजित करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर गेवराई शहरात दिनांक १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीच्या संयोजक पदी युवा नेते यशराज पंडित यांची निवड जाहीर करण्यात आली. या रॅलीच्या आयोजनासाठी दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजप जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, माजी जि प सभापती युधाजित पंडित, तिरंगा रॅलीचे संयोजक देविदास नागरगोजे,

युवानेते शिवराज पवार, युवा नेते यशराज पंडित, युवा नेते रोहित पंडित, रॅलीचे सहसंयोजक गणेश लांडे, संध्याताई राजपूत, भाजपा तालुका समन्वयक श्रीकांत सानप, माजी तालुकाध्यक्ष प्रकाशराव सुरवसे, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश हात्ते, माजी जि प अध्यक्ष मीराताई गांधले, माजी जि प सदस्य युवराज डोंगरे, माजी उपसभापती तुकाराम हराळे, निवृत्ती गोरडे, अंबादास पिसाळ, पोपटराव छाजेड, नगरसेवक शेख शेहदाद, प्रशांत राख, सज्जूभाई बागवान, सुभद्राताई थोरात, भाजयुमोचे दत्ता जाधव, भाजप सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष अमोल वडतीले, भाजप मंडळ अध्यक्ष ॲड उद्धव रासकर, सचिन दाभाडे, राजेश पवार, आदींची प्रमुख उपस्थिती होती.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26